RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. १० ऑगस्ट २०२६**



१९४६- पुणे सत्याग्रहात कारावास भोगुन आलेल्या स्त्रियांच्या सत्कारासाठी मुंबई येथे सभा.
१९४८- डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलामध्ये योग्य ते बदल करून संसदेला पुन्हा सादर केले. संकलन प्रा. यशवंत दुपटे

मंगळवार ११ ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २२२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 11 August 2026 | Year : 6 | Issue : 222 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्वाच्या बातम्या



### एसटी महामंडळाची चक्क नवी कोरी बस चोरी

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील जामनेर शहरातून एसटी महामंडळाची चक्क नवी कोरी बस चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी जामनेर एसटी आगारात प्रवेश करत महामंडळाची बस पळवून नेली. विशेष म्हणजे, चोरीला गेलेली ही बस सोमवारी सकाळी जामनेर तालुक्यातील शहापूर गावाजवळ आढळून आली. बसचे चाक पंक्चर झाल्याने चोरट्यांचा पुढील प्रवासाचा डाव फसला आणि त्यांनी बस रस्त्यावरच सोडून घटनास्थळावरून पोबारा केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मध्यरात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी जामनेर आगारातून एसटी बस चोरून नेल्याचे सांगण्यात येत आहे. आगारात उभी असलेली नवी कोरी बस चोरट्यांनी नेमकी कशा पद्धतीने पळवून नेली, याबाबत आता पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. एसटी आगारासारख्या महत्त्वाच्या आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या ठिकाणाहून थेट बसच चोरीला गेल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

चोरट्यांनी बस आगारातून बाहेर काढल्यानंतर ती जामनेर तालुक्यातील शहापूर गावाच्या दिशेने नेली. मात्र, शहापूर गावाजवळ येताच बसचे एक चाक पंक्चर झाले. त्यामुळे चोरट्यांचा बस पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. बस पंक्चर झाल्यानंतर चोरट्यांनी ती घटनास्थळीच सोडून दिली आणि अंधाराचा फायदा घेत तेथून फरार झाले.

### ओम्नी व्हॅन पुलावरून घसरून नाल्यात कोसळली; 6 जणांचा मृत्यू

**राजगड:** मध्य प्रदेशातील मुसळधार पाऊस नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे. सोमवारी राजगडमधील पचोर-खुजनेर मार्गावर एक ओम्नी व्हॅन पुलावरून घसरून नाल्यात कोसळल्याने भीषण अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, गाडीत 11 लोक होते; त्यापैकी दोघांची सुटका करण्यात आली, तर सहा जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका तीन वर्षांच्या मुलाचाही समावेश आहे आणि उर्वरित तीन जणांचा शोध सुरू आहे.



कारमधील सर्वजण देवासचे रहिवासी असल्याचे आणि सातवास ते कडलावड गावाकडे जात असल्याचे समजते. राजगडमधील पडना गावाजवळ असलेल्या 'झिरी' नाल्यावरील 30 फूट लांबीच्या पुलाचे बांधकाम सुरू होते. मुसळधार पावसामुळे पुलावरून पाणी वाहत होते. चालकाने गाडी पुलावरून नेण्याचा प्रयत्न केला, परंतु कार घसरली आणि नाल्यात पडली. दोन जण पोहून सुरक्षित बाहेर पडले, तर इतरजण व्हॅनमध्येच अडकून पडले.ओम्नी व्हॅनमध्ये 11 लोक होते, तीन पुरुष, चार महिला आणि चार मुले. मृतांमध्ये तीन पुरुष, दोन महिला आणि एका तीन वर्षांच्या मुलाचा समावेश आहे. उर्वरित तीन जणांचा शोध सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच एसडीएम रोहित बामहोरे आणि एसडीओपी अरविंद सिंग यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले. एसडीएम रोहित बामहोरे म्हणाले, ₹पुलावरून पाणी वाहत असल्याने ओम्नी व्हॅन नाल्यात पडली. आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे, तर दोघे पोहून बाहेर पडले आहेत. इतरांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. दरम्यान, क्रेनच्या साहाय्याने कार बाहेर काढण्यात आली. गाडीच्या नोंदणी क्रमांकावरून असे समजते की, ही कार सातवासमधील धानसाड गावातील मुकेश चौहान यांच्या नावावर नोंदणीकृत आहे.

### अफवांवर विश्वास ठेवू नका : मनोज जरांगे

**कवठेमहांकाळ :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारकडून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असून समाजाच्या नोंदी, कुणबी प्रमाणपत्रे आणि कागदपत्रांबाबत चुकीची माहिती पसरवली जात आहे. मराठा समाजाने कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केले. कवठेमहांकाळ येथील शिंदे पॅलेस, नरघोल रोड येथे सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित सभेत ते बोलत होते.



जरांगे-पाटील यांनी राज्य सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठविली. मराठा समाजाच्या नोंदी रद्द झाल्या, कुणबी प्रमाणपत्रे रद्द होणार किंवा अपलोड केलेल्या कागदपत्रांवर कारवाई होणार अशा प्रकारच्या चर्चा मुद्दाम पसरविल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. अशा अफवांमुळे समाजात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न होत असून मराठा समाजाने त्याला बळी पडू नये, असे ते म्हणाले. अधिकाऱ्यांनी कोणत्याही राजकीय दबावाखाली काम करू नये. कायद्याच्या चौकटीत राहून आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारेच निर्णय घ्यावेत. केवळ राजकीय आदेशांवर किंवा दबावाखाली समाजाच्या नोंदी व प्रमाणपत्रांबाबत कारवाई करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही निशाणा साधला. सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मराठा आरक्षणासाठी सुरू असलेला लढा शेवटपर्यंत सुरू राहणार असून समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सभेला तालुक्यासह परिसरातील सकल मराठा समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# रांचीमध्ये आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज



**रांची :** झारखंडची राजधानी रांची येथे JPSC-JSSC परीक्षेतील कथीत अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. आज या विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्‌ तोडून विधानसभेला घेराव घालण्यासाठी विधानभवनाकडे कुच करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष उफाळून आला. विद्यार्थ्यांनी पुढे सरकण्याचा आणि बॅरिकेड्‌ ओलांडण्याचा प्रयत्न केल्यानंतर, पोलिसांनी त्यांच्यावर पाण्याचा मारा आणि लाठीचार्ज केला. यानंतर, आंदोलक विद्यार्थ्यांनीही पोलिसांवर चपला आणि बूट फेकायला सुरुवात केली. या घटनेनंतर आंदोलनस्थळी तणाव वाढला आहे. पोलीस जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करत आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे.

या कारवाईसंदर्भात बोलताना राँचीचे पोलीस प्रमुख पारस राणा म्हणाले, पोलिसांनी वारंवार समज देऊनही आंदोलक ऐकण्यास तयार नव्हते. ते बैरिकेड्‌ तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. तसेच, पोलीस विद्यार्थ्यांच्या विरोधात नसून प्रशासन त्यांच्या मागण्यांबाबत संवेदनशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

दुसऱ्या बाजूला आंदोलक विद्यार्थ्यांनी पोलिसांवर अमानुष कारवाईचा आरोप केला आहे. नियमानुसार लाठीचा वापर कमरेच्या खाली करायचा असतो. पण, पोलिसांनी विद्यार्थ्यांचे डोके, हात आणि चेहऱ्यावर लाठ्या मारल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला आहे. या कारवाईमुळे विद्यार्थ्यांमध्ये राज्य सरकार आणि पोलिसांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करत आहेत.

### विद्यार्थ्यांच्या आंदोलनात समाजकंटक शिरलेत : रवींद्र पासवान

झारखंडची राजधानी रांची येथे विद्यार्थी आंदोलकांच्या 'विधानसभा घेराव मार्च'दरम्यान झालेल्या पोलिसांचा लाठीचार्ज आणि दगडफेक-चपलाफेक प्रकरणावर विद्यार्थी नेते रवींद्र पासवानने प्रतिक्रिया दिली आहे. विद्यार्थ्यांचे आंदोलन शांततापूर्ण आणि सनदशीर मार्गानेच सुरू आहे. मात्र, या आंदोलनाला वेगळे वळण देण्यच्या इराद्याने, काही समाजकंटक आंदोलनात शिरले आहेत. प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ शूटिंग तपासून अशा समाजकंटकांना शोधावे आणि कारवाई करावी, अशी मागणी रवींद्र पासवानने केला आहे. रवींद्र पासवान यांने आंदोलनात घडलेल्या हिंसक प्रकाराचा निषेध केला आहे. तसेच, प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ शूटिंग तपासून, पोलिसांवर चपला आणि बाटल्या फेकून वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी. आमचे स्वयंसेवकही अशा समाजकंटकांना शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. कोणत्याही विद्यार्थ्याला जवळपास संशयास्पद व्यक्ती आढळल्यास, त्यांनी तात्काळ आमच्या स्वयंसेवकांशी संपर्क साधावा, असे आवाहन रवींद्र पासवानने केले आहे.

### विद्यार्थ्यांची ताकद पाहून सरकार घाबरलंय : देवेंद्रनाथ महतो



जेएलकेएमचे विद्यार्थी नेते आणि उपोषणकर्ते देवेंद्रनाथ महतो यांनी सरकारवर आरोप करत सरकार विद्यार्थ्यांचा आवाज दाबत असल्याचं सांगितलं. सरकार घाबरलं आहे. सरकार सतत लाठीचार्ज करत आहे. हा त्यांचा भ्याडपणा आहे. आज आंदोलनाचा 17 वा दिवस आणि माझ्या उपोषणाचा 9 वा दिवस आहे, तरीही सरकार ऐकायला तयार नाही. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. असं असूनही जर सरकारनं ऐकलं नाही, तर झारखंड सरकारची जागतिक स्तरावर बदनामी होईल, जेएलकेएमचे विद्यार्थी नेते आणि उपोषणकर्ते देवेंद्रनाथ महतो यांनी सांगितलं. याचबरोबर, आता आमचे उपोषण सुरूच राहणार आहे. जोपर्यंत विद्यार्थ्यांचे समाधान होत नाही. तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहणार आहे, असं देवेंद्रनाथ महतो यांनी सांगितलं.

### विद्यार्थ्यांविरुद्ध बळाचा वापर चुकीचा : राहुल गांधी

पोलीस कारवाईवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी प्रतिक्रिया दिली. आंदोलकांवर बळाचा वापर करणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी त्याचा निषेध केला आणि राज्य सरकारला विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन संवादाद्वारे हा प्रश्न सोडवण्याचे आवाहन केले. काँग्रेस नेत्याने एक्स (X) वर पोस्ट करून, झारखंड सरकारला आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याचे आणि त्यांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण करण्याचे आवाहन केले. त्यांनी म्हटले की, झारखंडमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे चुकीचे आहे. विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार आहे आणि केवळ संवादातूनच तोडगा निघू शकतो. झारखंड सरकारने या विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण करावे.

## आसाम-अरुणाचल सीमेवर तणावपूर्ण परिस्थिती

**जोनाई/धेमाजी (आसाम) :** आसामच्या धेमाजी जिल्ह्यातील गोगमुखजवळ आसाम-अरुणाचल सीमावर्ती भागात सोमवारी काही समाजकंटकांनी केलेल्या गोळीबारात जवळपास आठ जण गंभीर जखमी झाल्याचं वृत्त आहे. ही घटना आसाम-अरुणाचल प्रदेश सीमेवर असलेल्या मिंगमांग वस्तीत घडली.

माहितीनुसार, गावकऱ्यांमधील या वादात आसामचे जवळपास 8 जण जखमी झाले आहेत. दरम्यान, अरुणाचल प्रदेशातील समाजकंटकांनी आसामच्या बाजूच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात येत असून याला विरोध केल्यावर ते संतप्त झाले व त्यांनी आसामच्या



रहिवाशांना लक्ष्य करून अंदाधुंद गोळीबार केला. जखमींपैकी एका व्यक्तीनं आरोप केला की, सामान्य नागरिकांच्या वेशात आलेल्या अरुणाचल प्रदेशच्या पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला. तसंच आसामच्या बाजूच्या लोकांना घाबरवणं हा या हल्ल्याचा उद्देश होता.

लोअर सुबनसिरी जिल्ह्याच्या उपआयुक्तांचा मुलगा आणि पोलीस अधिकारी, ओमांग ओमले, हे या गोळीबारात सामील होते, असाही आरोप जखमींनी केला आहे. दरम्यान, या घटनेतील गंभीर जखमींना सध्या गोगमुख, जोनाई आणि धेमाजी येथील मेडिकल सेंटरमध्ये दाखल करण्यात आलं आहे. तर प्रकृती खालावल्यानं तीन जखमींना दिब्रुगड मेडिकल कॉलेज रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. दुर्गेश्वर पाटीर, रोहित डोले, नागराज डोले, बिगेश्वर पाटीर, पामे पेगू, संजय तायंग, उत्पल डोले आणि जान डोले अशी जखमींची नावं आहेत. दरम्यान, सीमावर्ती भागात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे, असं वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं.

## जपतलाई आश्रमशाळेतील सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू

### आश्रमशाळांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**गडचिरोली :** धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील शासकीय आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिनाच्या रात्री विषारी सापाने विद्यार्थिनींना दंश केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला असून काही विद्यार्थिनींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या घटनेत अनु कोरेटी (८, इयत्ता २ री, रा. केहकावाही), सुश्मिता मंडल (१४, इयत्ता ८ वी, रा. मेडरी) आणि दीपिका लकडा (१२, इयत्ता ६ वी, रा. जवेली) यांचा मृत्यू झाला. समृद्धी नैताम (इयत्ता ८ वी) हिची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत असून दीपिका मडावी, कविता किरंगा यांच्यासह इतर विद्यार्थिनींवर उपचार सुरू आहेत.

रात्रीच्या वेळी विषारी साप आश्रमशाळेच्या परिसरात शिरल्यानंतर झोपलेल्या विद्यार्थिनींना दंश झाल्याने वसतिगृहात एकच गोंधळ उडाला. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सुविधा, आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्था, पलंग, मच्छरदाण्या तसेच प्रशिक्षित कर्मचारी यांचा अभाव असल्याच्या आरोपांमुळे प्रशासनाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहेत. या घटनेवर सामाजिक कार्यकर्ते अनिल केशवराव बारसागडे यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून आश्रमशाळांना केवळ कागदोपत्री सुविधा देण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या जीविताची प्रत्यक्ष सुरक्षा सुनिश्चित करण्याची मागणी केली



आहे. "आश्रमशाळा शिक्षणाची मंदिरे राहिली आहेत की उपेक्षेची काळी कोठडी?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि आदिवासीबहुल जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे जपतलाई घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांचे सुरक्षा व स्ट्रक्चरल ऑडिट, सामाजिक लेखापरीक्षण, नियमित कीटकनाशक फवारणी, पलंग व मच्छरदाण्यांची व्यवस्था, २४ तास प्रथमोपचार सुविधा, प्रशिक्षित कर्मचारी, महिला वॉर्डन आणि सुरक्षा रक्षकांची उपलब्धता याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारीही शासनाने गांभीर्याने स्वीकारावी. जपतलाईतील घटना केवळ अपघात म्हणून न पाहता भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करून ठोस कृती करण्याची मागणी होत आहे.

### लोकसभेकरिता काँग्रेसचे तीन मुद्दे निश्चित

**नवी दिल्ली:** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी आपल्या तीन मागण्या पुन्हा मांडल्या, ज्यांना त्यांनी असे म्हटले आहे संसदेतील कोंडी फोडण्यासाठी, आपल्या 'न बदलता येणाऱ्या मागण्यांच्या यादी'त, काँग्रेस नेत्याने पुनरुच्चार केला की, नीट पेपरफुटीच्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचे आदेश कोणी दिले, हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत सांगितले पाहिजे. ते म्हणाले की, शाह यांच्या निवेदनाशिवाय, जे घडले त्याबद्दल पंतप्रधान मोदींनी माफी मागावी आणि अयोध्येतील राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी जबाबदारी निश्चित करावी.

दिल्लीत आपल्या तरुणांवर झालेल्या गोळीबाराला कोणी आदेश दिला, हे अमित शाह यांनी स्पष्ट करायलाच हवं, हा नेहमीच प्रश्न होता. पेलेट गनने गोळीबार झाला, विद्यार्थ्यांना खिळे लावलेल्या लाठ्यांनी मारहाण करण्यात आली. त्यांनी सत्य समोर आणायला हवं. त्यांनी तसा आदेश दिला होता की नाही? जर त्यांनी आदेश दिला असेल, तर आपल्या मुलांच्या गोळीबारासाठी ते दोषी आहेत. आणि जर त्यांना हे घडत असल्याची माहिती नसेल, तर ते अकार्यक्षम आहेत. दोन्ही परिस्थितीत, त्यांनी जायलाच हवं. हीच चर्चा होती, असे राहुल गांधी पत्रकार परिषदेत म्हणाले.

### कोलंबियामध्ये ७.४ तीव्रतेचा भूकंप

**नवी दिल्ली:** कोलंबियामध्ये एक शक्तिशाली भूकंप झाला आहे. युरोपियन-मेडिटेरेनियन सिस्मोलॉजिकल सेंटर (EMSC) नुसार, भूकंपाची प्राथमिक तीव्रता ७.४ होती आणि त्याचा केंद्रबिंदू ११५ किलोमीटर खोलीवर होता. दरम्यान, कोलंबियाच्या भूवैज्ञानिक सेवेने त्याची प्राथमिक तीव्रता ६.७ सांगितली आहे. राजधानी बोगोटासह अनेक भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. हे धक्के शेजारील इक्वेडोरपर्यंत जाणवले. भूकंपामुळे घबराट पसरली आणि अनेकांनी आपली घरे व इमारती सोडून पलायन केले.

ईएमएससीनुसार, कोलंबियातील भूकंपाची तीव्रता ७.४ होती आणि तो ११५ किलोमीटर खोलीवर झाला. दोन्ही संस्थांनुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू कोलंबियाची राजधानी बोगोटाच्या पश्चिमेला सुमारे ४०० किलोमीटर अंतरावर असलेल्या सॅन होजे डेल पाल्मार येथे होता. अनेक भागांत भूकंपाचे धक्के जाणवल्याचे वृत्त आहे. तथापि, कोलंबियाच्या भूवैज्ञानिक सेवेने भूकंपाची प्राथमिक तीव्रता ६.७ सांगितली.

## भदंत सुरेई ससाई यांच्या एकाधिकारशाही व हुकूमशाहीमुळे स्मारक समितीच्या विकास कार्यात अडथळे : विलास गजघाटे

**नागपूर :** प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी नागपूरच्या विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होत असून, भदंत सुरेई ससाई यांच्या कथित एकाधिकारशाही व हुकूमशाही वृत्तीमुळे समितीच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचा गंभीर आरोप समितीचे अध्यक्ष विलास गजघाटे यांनी केला आहे. स्मारक समिती च्यावतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई हे मागील तीन वर्षांपासून समितीची सभा घेत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ससाई यांचे सेवक रवींद्र मेंढे आणि माजी सचिव हे बाहेरील लोकांचे सल्ले घेतात त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय व स्मारक समितीचे निर्णय स्वतःच्या मर्जीने घेतले जात असल्याचेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे. मागील तीन वर्षांपासून समितीच्या आर्थिक व्यवहारांवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. कायद्याने निवड झालेल्या सचिवाला तसेच धर्मादाय उपायुक्तांनी दिलेल्या निर्णयांना मान्यता नसल्याचा आरोप करत, दीक्षाभूमीच्या विकासाबाबत समितीच्या सदस्यांशी योग्य प्रकारे विचार विनिमय केला जात नसल्याचे गजघाटे यांनी म्हटले आहे. समितीच्या आर्थिक व्यवहारांना मागील तीन वर्षांपासून मंजुरी घेण्यात आलेली नसल्याचाही दावा त्यांनी केला आहे.



पत्रकानुसार, समितीचे सर्व आर्थिक व्यवहार व प्रशासकीय निर्णय काही विशिष्ट व्यक्तींच्या सल्ल्याने घेतले जात असून, त्यामुळे दीक्षाभूमीच्या विकासकामांवर परिणाम होत असल्याचा आरोप आहे. यासंदर्भात २२ जून २०२६ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत बहुमताने ससाई यांना अध्यक्ष व सदस्य पदावरून हटवून त्याबाबतचा चेंजरिपोर्ट धर्मादाय उपायुक्तांकडे पाठविण्यात आल्याचे पत्रकात नमूद आहे. स्मारक समितीच्या ८ सदस्यांनी ससाई यांच्या विरोधात माननीय धर्मदाय आयुक्त यांच्याकडे ४१ डी, अंतर्गत केस दाखल केलेली आहे. दरम्यान, समितीतून काढून टाकल्यानंतरही ससाई अध्यक्ष म्हणून पत्रव्यवहार करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. समितीची बैठक घेण्यासाठी बाहेरील व्यक्तींच्या माध्यमातून कार्यालयाचे कुलूप तोडण्यात आले आणि त्यानंतर समितीच्या सदस्यांविरोधात पोलिस ठाण्यात खोटी तक्रार दाखल करून बदनामी करण्यात आल्याचा आरोपही गजघाटे यांनी केला आहे. ₹स्मारक समितीचे आम्ही मालक असून दीक्षाभूमीही आमची मालकीची आहे, अशा भूमिकेतून समितीच्या सदस्यांशी व्यवहार करणे योग्य नाही. अध्यक्ष किंवा सदस्य नसतानाही लेटरहेडचा वापर करून विद्यापीठ, शासन व इतर ठिकाणी पत्रव्यवहार केला जात आहे, असा आरोप पत्रकातून करण्यात आला आहे. तसेच, ससाई यांच्याकडून प्रसारमाध्यमांना डॉ. राजेंद्र गवई व विलास गजघाटे यांना समितीतून काढून टाकल्याची माहिती दिली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. ₹कायद्याने कोणतीही बैठक न घेता एकट्याने निर्णय घेता येतात का ? असा सवाल उपस्थित करत, समितीतील अंतर्गत वादामुळे दीक्षाभूमीच्या विकासाला बाधा निर्माण होत असल्याची चिंता गजघाटे यांनी व्यक्त केली. दीक्षाभूमीच्या विकासकामांमध्ये मागील काही वर्षांत झालेल्या कथित आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहारांचे पुरावे लवकरच प्रसारमाध्यमांद्वारे जनतेसमोर सादर करण्यात येतील, असेही अध्यक्ष विलास गजघाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

★ ज्वलंत विषयावरील ★
अनमोल संदर्भग्रंथ




उपवर्गीकरण, क्रिमी लेअर आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका
बहुजन सौरभ कार्यालय, नागपूर येथे उपलब्ध
▶ आजच्या ज्वलंत सामाजिक विषयावर आधारित ह ह अभ्यासपूर्ण, संशोधनाधारित आणि संदर्भसमृद्ध ग्रंथ आता बहुजन सौरभ कार्यालय, नागपूर येथे उपलब्ध आहे.
ही अल्पावधात प्रकाशित दुसरी आवृत्ती आहे.
▶ हा ग्रंथ श्रीराम बनसोड यांनी वाचकांसाठी नागपूर येथे उपलब्ध करून दिला अशून, जिज्ञासू वाचक, चिद्यार्थी, अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी बहुजन सौरभ कार्यालयातून हा ग्रंथ अवश्य घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.
ग्रंथ उपलब्ध ठिकाण : बहुजन सौरभ कार्यालय १/२, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर – ४४००२७
संपर्क : श्रीराम बनसोड 8208617748
ग्रंथाचे देणगीमूल्य : फक्त ₹60
कार्यालय मो. नं. 9422860648

“ हजारो शिंपले उघडल्यावर, एक मोती सापडतो... ”



## बहुजन सौरभ संपादकीय

# झेड-अल्फा पिढीचा एल्गार

जनरेशन झेड आणि जनरेशन अल्फा या दोन पिढ्यांकडे आज समाज कुतूहलाने पाहतो आहे. हातात मोबाईल, डोळ्यांसमोर जग, एका क्लिकवर माहिती आणि अन्याय दिसला की त्यावर थेट प्रश्न, ही या पिढीची ओळख बनत आहे. काहींना ही पिढी उद्धट वाटते, काहींना आक्रमक; तर काही जण सोशल मीडियाच्या अतिरेकाचा परिणाम म्हणून तिच्याकडे पाहतात. पण या पिढीच्या आक्रमकतेमागे एक मूलभूत सत्य दडलेले आहे, ही पिढी प्रश्न विचारायला शिकली आहे. “आमच्या शाळेत शिक्षक का नाही?”, “आमच्या वर्गात बसायला बाक का नाही?”, “मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह का नाही?”, “पिण्याचे पाणी का नाही?”, “वीज नाही, पंखे नाहीत, मग आम्ही शिकायचे कसे?” आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न, “आमची शाळाच बंद का केली जात आहे?” या प्रश्नांना जर सरकार, प्रशासन आणि समाजाकडे समाधानकारक उत्तरे नसतील, तर दोष विद्यार्थ्यांच्या आक्रमकतेत नाही; दोष व्यवस्थेच्या अपयशात आहे. आज महाराष्ट्रात शिक्षणव्यवस्थेच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विद्यार्थीसंख्या कमी असल्याचे कारण पुढे करून शाळांचे विलिनीकरण, शाळा बंद करणे किंवा दुर्गम भागातील शाळांची उपयुक्तता कमी लेखणे, हा मार्ग कुठे घेऊन जाणार आहे, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सरकारी शाळा म्हणजे केवळ चार भिंतींची इमारत नाही. ती गरीबाच्या मुलासाठी संधीची दारे उघडणारी व्यवस्था आहे. शेतकऱ्याच्या मुलाला, शेतमजुराच्या मुलाला, कामगाराच्या मुलाला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलाला शिक्षण देणारी ती सर्वांत महत्त्वाची सामाजिक यंत्रणा आहे. प्रत्येक कुटुंबाला आपल्या मुलाला हजारो रुपये फी भरून इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळेत पाठवणे शक्य आहे का? नाही! मग सरकारी शाळा बंद झाल्यावर या मुलांचे काय? शाळा बंद करणे हा फक्त प्रशासकीय निर्णय नसतो; तो एखाद्या गरीब कुटुंबाच्या मुलाच्या भविष्यावर घेतलेला निर्णय असतो. आजच्या झेड-अल्फा पिढीला जगातील वास्तव मोबाईलच्या पडद्यावर दिसते. त्यांना जगातील अत्याधुनिक शाळा दिसतात, स्मार्ट क्लासरूम दिसतात, प्रयोगशाळा दिसतात, क्रीडा सुविधा दिसतात आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्याच गावातील शाळेत छत गळते, स्वच्छतागृह नाही, शिक्षक अपुरे आहेत, पिण्याचे पाणी नाही, वीज नाही. मग हा विद्यार्थी प्रश्न विचारणार नाही तर काय करणार? एका हातात डिजिटल इंडिया आणि दुसऱ्या हातात मोडकळीस आलेली शाळा या विरोधाभासाचे उत्तर सरकारने द्यायलाच हवे. आज सरकार शिक्षणाच्या डिजिटल क्रांतीची भाषा करते. स्मार्ट बोर्ड, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल सामग्री, तंत्रज्ञानाधारित शिक्षण यांची चर्चा होते. हे सर्व स्वागतार्ह आहे. पण ज्या शाळेत शिक्षकच उपलब्ध नाही, त्या शाळेत स्मार्ट बोर्ड बसवून काय साध्य होणार? ज्या वर्गात मुलांना बसायला पुरेशी जागा नाही, तिथे डिजिटल शिक्षणाचे स्वप्न किती वास्तववादी आहे? पहिले शिक्षक द्या, मग तंत्रज्ञान द्या. पहिले शाळा वाचवा, मग स्मार्ट शाळेची घोषणा करा. शिक्षण हा खर्च नाही; तो सामाजिक गुंतवणुकीचा सर्वांत मोठा प्रकार आहे. मात्र शिक्षणाच्या बजेटकडे केवळ आर्थिक भार म्हणून पाहिले गेले, तर त्याची किंमत पुढच्या पिढ्यांना मोजावी लागेल. या प्रश्नावर केवळ सरकारलाच दोष देऊन भागणार नाही. लोकप्रतिनिधींचीही जबाबदारी आहे. आमदारांनी आपल्या मतदारसंघातील सरकारी शाळांची आकडेवारी मागवावी. किती शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत? किती शाळांना स्वच्छतागृह नाही? किती शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या आहे? किती शाळांच्या इमारती धोकादायक आहेत? किती शाळा बंद किंवा विलीन करण्याच्या प्रक्रियेत आहेत? खासदारांनी संसदेत प्रश्न विचारावेत. आमदारांनी विधानसभेत आवाज उठवावा. जिल्हा परिषद सदस्यांनी आपल्या जिल्ह्यातील शाळांची पाहणी करावी. महानगरपालिका सदस्यांनी शहरातील मराठी माध्यमाच्या शाळांची परिस्थिती तपासावी. निवडणुकीच्या वेळी मुलांच्या हातात पुस्तके देऊन फोटो काढणे सोपे आहे; पण त्याच मुलांच्या शाळेत वर्षभर शिक्षक उपलब्ध करून देणे ही खरी लोकसेवा आहे. अधिकारी वर्गानेही कागदोपत्री अहवालांमधून बाहेर पडण्याची वेळ आली आहे. कार्यालयात बसून “सर्व सुविधा उपलब्ध आहेत” असे दाखवणाऱ्या अहवालांपेक्षा प्रत्यक्ष शाळेतील परिस्थिती महत्त्वाची आहे. शिक्षकांची जबाबदारीही कमी नाही. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारा कर्मचारी नाही. तो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणारा राष्ट्रनिर्माता आहे. त्याच्यावर अनावश्यक प्रशासकीय कामांचा बोजा टाकून त्याला अध्यापनापासून दूर ठेवणे थांबले पाहिजे. पालकांनीही आता केवळ “माझ्या मुलाला नोकरी मिळाली पाहिजे” एवढ्यावर थांबू नये. “माझ्या मुलाला दर्जेदार आणि समान शिक्षण मिळाले पाहिजे”, ही मागणी त्यांनी केली पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारणे सुरूच ठेवले पाहिजे. मात्र त्या प्रश्नांना संविधानिक आणि लोकशाही मार्गाची जोड मिळाली पाहिजे. आंदोलन करा, निवेदन द्या, ग्रामसभेत प्रश्न विचारा, शिक्षण अधिकाऱ्यांकडे तक्रार करा, माहितीच्या अधिकाराचा वापर करा; पण प्रश्न विचारण्याची सवय सोडू नका. कारण प्रश्न विचारणारी पिढीच उद्याची लोकशाही मजबूत करते. आज झेड-अल्फा पिढी म्हणते आहे, “आम्हाला दया नको, आम्हाला आमचा हक्क हवा.” हा आवाज दुर्लक्षित करणे म्हणजे भविष्यातील सामाजिक असंतोषाला आमंत्रण देणे होय. जात, धर्म, भाषा, श्रीमंती किंवा गरिबी यापलीकडे प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळणे हा त्याचा अधिकार आहे. सरकारी शाळा मजबूत असतील तर समाजातील विषमता कमी होईल. सरकारी शाळा दुर्बल झाल्या तर शिक्षणही श्रीमंत आणि गरीब यांच्यात विभागले जाईल. म्हणूनच आजचा खरा प्रश्न “सरकारी शाळेत किती विद्यार्थी आहेत?” हा नसून “सरकारी शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपण किती दर्जाचे शिक्षण देत आहोत?” हा असला पाहिजे. विद्यार्थी कमी आहेत म्हणून शाळा बंद करण्याऐवजी त्या शाळेत विद्यार्थी का कमी झाले, याचा शोध घ्या. शिक्षक नाहीत म्हणून पालकांनी मुलांना दुसरीकडे पाठवले का? सुविधा नाहीत म्हणून विद्यार्थी खासगी शाळांकडे वळले का? मराठी माध्यमाविषयी न्यूनगंड निर्माण झाला का? या मूळ प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. शाळा वाचवण्याचा संघर्ष हा केवळ शिक्षणाचा संघर्ष नाही; तो सामाजिक समतेचा संघर्ष आहे. आजच्या झेड-अल्फा पिढीने व्यवस्थेला आरसा दाखवला आहे. आता त्या आरशात स्वतःचे प्रतिबिंब पाहण्याची वेळ सरकारची आहे. मुलांना गप्प करू नका. त्यांचे प्रश्न ऐका. त्यांच्या शाळा वाचवा. कारण आज एक शाळा बंद होते, तेव्हा केवळ एक इमारत बंद होत नाही; एका गावाच्या भवितव्याचे दार बंद होते आणि जर ही दारे एकामागून एक बंद होत गेली, तर उद्या प्रश्न फक्त शाळांचा राहणार नाही. उद्या प्रश्न असेल, आपण कोणत्या महाराष्ट्राची निर्मिती केली? झेड-अल्फा पिढीचा हा एल्गार आहे, शाळा बंद करू नका; आमचे भविष्य बंद करू नका! ●●

# जातीय भेदभाव संपला नाही

## मग क्रिमीलेअर कशासाठी ?

आरक्षणाच्या बाहेर गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या अनुसूचित जाती-जमातींच्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून समान संधी मिळायला हवी, हे संविधानाचे तत्त्व आहे. परंतु प्रत्यक्ष निवड प्रक्रियेत जातीय पूर्वग्रह पूर्णपणे नाहीसे झाले आहेत का, हा स्वतंत्रपणे तपासण्याचा विषय आहे. जर एखाद्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्याला क्रिमीलेअरच्या निकषामुळे आरक्षणाचा लाभ नाकारला आणि त्याचवेळी सामाजिक पूर्वग्रहांमुळे खुल्या प्रवर्गातही समान संधी मिळाली नाही, तर त्या व्यक्तीसमोर कोणता मार्ग उरेल?




यामुळेच अनुसूचित जाती-जमातींमध्ये क्रिमीलेअरच्या संकल्पनेविषयी असुरक्षितता निर्माण झाली आहे.
क्रिमीलेअर लागू केल्यास आरक्षणाचे स्वरूप बदलण्याचा धोका आहे.
आरक्षणाचा उद्देश केवळ आर्थिक गरिबी दूर करणे हा नाही. जर क्रिमीलेअरचा निकष प्रामुख्याने उत्पन्नावर आधारित केला, तर अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाचे स्वरूप हळूहळू आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या योजनेसारखे होण्याचा धोका आहे.
आर्थिक दुर्बलतेसाठी संविधानाने स्वतंत्र तरतुदी केल्या आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाची ऐतिहासिक आणि सामाजिक भूमिका वेगळी ठेवणे आवश्यक आहे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेच्या चर्चेत अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण किंवा क्रिमीलेअर लागू केले नाही. त्यांचा भर सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी घटनात्मक संरक्षण, राजकीय प्रतिनिधित्व, शिक्षण, रोजगारातील प्रतिनिधित्व आणि सामाजिक समानता यांवर होता. त्यांच्या दृष्टीने जातव्यवस्था ही केवळ आर्थिक विषमतेची व्यवस्था नव्हती; ती सामाजिक श्रेणीबद्धता आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न होती. म्हणूनच आज आपण कोणताही नवीन आरक्षण निकष स्वीकारताना डॉ. आंबेडकरांच्या घटनात्मक तत्त्वज्ञानाचा व्यापक संदर्भ विसरता कामा नये. सध्याच्या प्रतिज्ञापत्रात केंद्र सरकारने अनुसूचित जाती जमाती आरक्षणासाठी क्रिमीलेअर लागू करण्यास विरोध केला आहे. याचे आम्ही स्वागत करतो. केंद्राचे म्हणणे असे आहे की अनुसूचित जाती जमाती वरील ऐतिहासिक सामाजिक भेदभावाचा प्रश्न ओबीसी आरक्षणाच्या संदर्भातील क्रिमीलेअर संकल्पनेपेक्षा वेगळा आहे.
आता सर्वोच्च न्यायालय या विषयाकडे कोणत्या घटनात्मक दृष्टिकोनातून पाहते, हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. सामाजिक न्यायाचा प्रश्न केवळ उत्पन्नाच्या आकड्यांत मोजता येत नाही हे आरक्षण विरोधकांनी समजून घेतले पाहिजे. अनुसूचित जाती-जमातींमधील अंतर्गत विषमता नाकारता येणार नाही. आरक्षणाचा लाभ सर्वात वंचित घटकांपर्यंत पोहोचला पाहिजे, हे म्हणणे रास्त आहे. त्यासाठी उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअर हा एकमेव मार्ग नाही. प्रतिनिधित्वाचा अभ्यास, वस्तुनिष्ठ आकडेवारी, शिक्षणातील असमानतेची कारणमीमांसा आणि उपाय, रोजगारातील प्रतिनिधित्व आणि सामाजिक भेदभाव यांचा व्यापक अभ्यास करूनच कोणतेही धोरण ठरविले पाहिजे. आज क्रिमिलेयर विषयावर कोणताही अहवाल उपलब्ध नाही. अनुसूचित जाती जमाती आयोगाचे मत उपलब्ध नाही. सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक भेदभावाचे वास्तव दुर्लक्षित होता कामा नये आणि समानतेच्या नावाखाली ऐतिहासिक अन्यायाची जाणीवही पुसली जाता कामा नये. आज सर्वोच्च न्यायालयासमोरचा प्रश्न केवळ क्रिमीलेअर लागू करायचा की नाही एवढाच नसावा. प्रश्न आहे अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाचा घटनात्मक उद्देश आपण नेमका काय आहे? संविधान निर्मात्यांनी हे निकष का लावले नाही? आरक्षण हा उद्देश आर्थिक मदत आहे की सामाजिक न्याय? जर तो सामाजिक न्यायाचा उपाय असेल, तर सामाजिक भेदभावाचे अस्तित्व, प्रतिनिधित्वाची वास्तविक स्थिती आणि ऐतिहासिक वंचितता यांचा विचार केल्याशिवाय केवळ उत्पन्नाच्या निकषावर आरक्षणाचा लाभ नाकारता येईल का? याचे उत्तर केवळ न्यायालयीन तर्काने नव्हे, तर संविधानाच्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वज्ञानातून शोधावे. उपवर्गीकरण असो किंवा क्रिमीलेअर - अनुसूचित जाती-जमातींच्या घटनात्मक हक्कांवर परिणाम करणारा कोणताही निर्णय वस्तुनिष्ठ आकडेवारी, सामाजिक वास्तव आणि संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या कसोटीवरच झाला पाहिजे. केंद्र सरकारने क्रिमीलेअरसाठी स्पष्ट विरोध दर्शविला. राज्य सरकारचेही मत तसेच येईल अशी अपेक्षा करू या. आज सर्वोच्च न्यायालयात या विषयावर पुढील कायदेशीर भूमिका काय आकार घेते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. ●●



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची

## कृतघ्नता जीवनाला बळ देते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विकासान्मुख आंबेडकरी समाज आंबेडकरी पुढाऱ्यांनी समस्यांच्या भोवऱ्यात अडकवला. समाज राष्ट्रीय प्रवाहात पुरता आला नाही. जुन्या समस्या काही अंशी कमी झाल्या पण नव्या समस्या पावलागणिक वाढल्या. यातून ज्याची त्याला मुक्ती करावी लागते. मुक्तीचा नवा मार्ग शोधावा लागतो. हे बळ डॉ. बाबासाहेबांनी दिले. आक्रांत हिंदूधर्माने स्वतःच्या अनुयायांना हजारो वर्षे जनावरासारखे वागवले. ते खरे असल्याचे दाखवण्यासाठी रुढी, परंपरा, मनुस्मृती, वेद, उपनिषदे, पुराणांचे दाखले तयार केले. असाच खोटा इतिहास बी. एन. रावने संविधान लिहिल्याचा ७५ वर्षांनंतर अनिल मिश्रा नावाच्या ब्राम्हण वकिलाने तयार केला. वकील आसुतोष दुबे, वकील राकेश किशोर या ब्राम्हणांनी सोबत दिली. खोटा इतिहास लिहिण्यात त्यांच्या पिढ्या गेल्या. संत-महात्म्यांची भूमी असा भारत देशाचा परिचय आहे. संत कबीर, तुकोबा, चोखोबा, रविदास, महाप्रभू, ज्ञानेश्वर, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, बसवेश्वर. स्वामी विवेकानंद, विनोबा भावे, म. ज्योतिबा, माता सावित्री, फातिमा शेख, पंडिता रमाबाई, बाबासाहेब जांभेकर, रवींद्रनाथ टागोर, पेरियार रामस्वामी, डॉ. पंजाबराव देशमुख, दादाभाई नौरोजी, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, महर्षी कर्वे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड वगैरे थोर पुरुषांनी मानवता विरोधी कृत्यावर धर्म टाळून प्रहार केला. पण मानवतेचा विरोध करणाऱ्या हिंदू धर्माचे दोष कोणीही पुढे आणले नाही. गटारा बाहेर निघून गटार साफ करणे कोणालाही सुचले नाही. सगळे गटारात राहून मोक्षाची व्याख्या करत राहिले. गटारात राहून मोक्ष मिळणारा पुढे आला नाही. बाबा रामजी सेनेत सुभेदार पण समाजात अस्पृश्य होते. हिंदूधर्माच्या अस्पृस्यावरील अत्याचाराचे शिकार होते. या व्यथेतून समाज मुक्त करण्याची त्यांची प्रबळ इच्छा होती. त्याकरिता बाळ भीवाला बलवान करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. “जावे त्यांच्या वंशा तेंव्हा कळे” तसे बाळ भीमाचे झाले. प्रचंड विद्वत्तेचे धनी (भीवा) (भीमा) डॉ. बाबासाहेब आंबेडकरही वर्ण, जाती विषमतेला बळी पडले. बाबा रामजीनी भीमरावाला बुद्धीमान करण्याचा ध्यास धरला. त्यासाठी अफलातून प्रयोग केले. भीमाच्या शिक्षणात मदतीसाठी त्यांच्या अल्प वयात निरक्षर पोरक्या रमाशी भीवाचा विवाह केला. भीमाचे बाबा रमाचे बाबा झाले. सून मुलगी झाली. अजब गजब हे रसायन पुढे आले. रमा भीमाच्या प्रतिष्ठेला जपली. फाटक्या लुगड्यावर राहिली. मुंबई शहरात डोक्यावर टोपली घेऊन, मैलो फिरुन, गोवऱ्या वेचून कुटुंबाचे भरण-पोषण केले. त्यातून पै पैसा साठवून स्वतः उपाशी राहून भीमाची आबाळ होऊ नये म्हणून विलायतेला १५-१६ रू. पाठवायची. स्वाभिमानी होती. शाहू महाराजांनी सन्मानार्थ डॉ. बाबासाहेबांना जरीचा लांब फेटा बांधला. डॉ. बाबासाहेबांच्या स्वागताला जाण्यासाठी चांगली साडी नव्हती. ती पतीचा फेटा नेसली. बाबा रामजीच्या स्मृतीदिनाला डॉ. बाबासाहेबांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना बोंबील वाढण्याचा बेत केला. रमा म्हणाली लोक हसतील. डॉ. बाबासाहेब म्हणाले, “यांना कोण वाढणार”? अखेर बाबांच्या स्मृती दिनाला बोंबीलचे जेवण वाढले. डॉ. बाबासाहेबांनी वकिलीच्या पैशाने फाटक्या रमाच्या हातात सोन्याच्या बांगड्या दिल्या. रमा धारवाडला गेली. वसतिगृहाची मुले उपाशी पाहून मुलांच्या जेवणासाठी तिने आपल्या बांगड्या दिल्या. रमा, भीमाने रामजीचे संस्कार घेतले. भीमाने हे संस्कार समाजात पेरले. भीमा कधीही बाबांच्या शब्दाबाहेर गेले नाही. भीमाने रमाला पत्र वाचायला, लिहायला शिकवले. लायक केले. बाबा रामजीने अभ्यासक्रमाव्यतिरिक्त भीमाला पुस्तके वाचण्याचा छंद लावला. ग्रंथ भीमाचे जीव की प्राण झाले. त्यांची स्वतःची पन्नास हजार दुर्मिळ ग्रंथांची संपदा झाली. ग्रंथ वाचन त्यांच्या जीवनाचा भाग ठरला. जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत ते वाचत राहिले. ग्रंथ वाचनातून त्यांनी प्रचंड ज्ञान संपती प्राप्त केली. जगातील सर्वोच्च दर्जाचे ज्ञानाचे मानकरी ठरले. बत्तिस पदव्यांचा सांभार पाठिशी बांधला. त्यांच्या विद्वत्तेचा जगाने लोहा मानला. पण स्वदेशात वंचित, अस्पृश्य, बहिष्कृत राहिले. बडोदे सरकारच्या सेवेत असताना कार्यालयातील परिचर त्यांच्याकडे फाइल फेकून विटाळ माणायचा. डॉ. बाबासाहेबांनी समाजाचे,



देशाचे दुःख पोटतिडकीने समजून घेतले. हिंदू धर्माने धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, गुलामी प्रसवली. यावर डॉ. बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने वयाच्या २९ व्या वर्षी प्रहार करणे सुरू केले. वंचित समाजाच्या समस्या फार. त्या निस्तारणे सोपे नव्हते. डॉ. बाबासाहेबांच्या हाताशी कार्यकर्त्यांची फळी नव्हती. अस्पृश्यांया, देशाच्या गुलामीची कारणे शोधली. कारणांची जळ हिंदूधर्मात, हिंदूग्रंथात, सापडली. डॉ. बाबासाहेबांनानी यावर हल्ला केला. हिंदू धर्माने समाजात वर्ण-जाती, गरीबी-श्रीमंती, स्त्री-पुरुष भेद केले. शुद्र-स्त्री अत्याचार, ब्राम्हणेतर ब्राम्हणाचे दास, गुलाम चाकर ठरवले. डॉ. बाबासाहेबांनी ब्राम्हण वर्चस्व प्रस्थापित करणारा कोण याचा शोध घेतला. तेंव्हा कळले “ब्राम्हण ऋषी, मुनींनी स्वतःच्या श्रेष्टत्वासाठी देव साकारले. ते हळू हळू विकसित केले. विविध रचना केल्या. त्यांना अपौरुषेय घोषित केले. कपट कारस्थानाचा उद्योग केला. धर्मात जम बसवला. धर्म अफिमची गोळी केली. अंधश्रद्धा, चमत्कारात बहुजन बुडवला. ब्राम्हणांनी स्वतःला, बुद्धिमान, श्रेष्ठ ठरवले. स्वतःच्या स्तुतीचे भरभरून ग्रंथ लिहिले. त्या ग्रंथाना धर्मग्रंथ घोषित केले. अज्ञानी बहुजनांनी निमुटपणे मान्य केले. या पक्षपाती हिंदू धर्मातून मुक्ती साठी डॉ. बाबासाहेबांनी एकट्याने एकाच वेळेस संघर्षाचे अनेक मोर्चे उघडले. मानवी हक्कासाठी चळवळी केल्या. महाड, नाशिक, अमरावती, मनुस्मृती दहन, पुणे प्याक्ट, मनुस्मृती दहन, हिंदू कोड-बील, येवले प्रतिज्ञा, धर्मांतरण, दीक्षाभूमी, संविधान निर्मिती केली. डॉ. बाबासाहेबांनी ६७४३ जातीत विखुरलेला बहुजन समाज अनुसूची प्रवर्गात एकत्र आणला. संघटित केला. विरोध कोणाचाही केला नाही. मानवी हक्कासाठी लढा दिला. “हक्क मागून मिळत नाही. ते संघटीत होऊन मिळवावे लागते; यासाठी संघर्ष, त्याग करावा लागतो. प्रज्ञा, शीलाचे पालन करावे लागते.” याचे धडे कृतीतून अनुयायांना दिले. डॉ. बाबासाहेबांनी समाज जागृतीसाठी कलम चालवली. कलम धारदार केली. समाजाचे डोके कार्यान्वित केले. समाज घेतला, गतिमान केला. युवकांना पाय मजबूत करण्याचा, परिवाराला आधार होऊन संघर्षात उतरण्याचा, समाजासाठी जगण्याचा महामंत्र दिला. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने नागसेन वनात शिकणारा प्रभावीत होतो. डॉ. बाबासाहेबांनी प्रज्ञा, शील, प्रामाणिकतेस अनन्यसाधारण महत्त्व दिले. डॉ. बाबासाहेबांनी औरंगाबादमध्ये (वर्तमान संभाजीनगरात) पहाडाच्या पायथ्याशी पीईएसच्या २१६ एकराच्या प्रचंड नागसेन वनात मिलिंद कला, विज्ञान, वाणिज्य आणि इतर महाविद्यालये सुरू केली. सर्वांना शिक्षणासाठी संधी मिळवून दिली. येथे शिकणाऱ्यांना वसतिगृहाची शिष्यवृत्ती मिळवून दिली. या बळावर माझ्यासारख्या अनेकांना शिकता आले. शिकता येते. शिक्षणाचा मार्ग खुला केला. १९६६ ला मी मिलिंद सायंसचा जनरल सेक्रेटरी होतो. डॉ. एम. एल. शहारे प्राचार्य होते. नागसेन वनात शिकणाऱ्याला वसतिगृहाची मासिक शिष्यवृत्ती मिळते. डॉ. बाबासाहेबांचा सरकारशी झालेला अलिखीत करार पाळला जातो. महाविद्यालयांना आगावू शिष्यवृत्ती मिळते. १९६६ ला विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना ३-४ महिने शिष्यवृत्ती मिळाली नाही. गंभीर परिस्थिती निर्माण झाली. मुलांना खायला, परत जायला पैसे नव्हते. उपास तरी किती करणार? मी विद्यार्थी मंडळाच्या सर्व सेक्रेटरींना सोबत घेऊन प्राचार्यांशी भेट घेतली. प्राचार्य कक्षात द्वितीय मराठी भाषेचे प्रा. गंगाधर पानतावणे होते. विद्यार्थ्यांच्या अडचणी सांगितल्या. शिष्यवृत्तीची पर्यायी व्यवस्था करण्यास विनंती केली. हे ऐकताच प्रा. गंगाधर पानतावणे आमचेवर भडकले. म्हणाले, “तुमची व्यवस्था तुम्ही करा. प्राचार्यांना खूप कामे करावी लागतात. त्रास देऊ नका.” मी म्हटले, “सर, आम्हाला प्राचार्यांशी बोलू तर द्या!” प्रा. पानतावणे म्हणाले, “आमच्या गंभीर विषयावर चर्चा सुरू आहेत.” मी म्हटले, “सर आमचा शिष्यवृत्तीचा विषयही गंभीर आहे. तुम्ही चर्चेला घ्या. काही तरी मार्ग काढा. इतर महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नियमित मिळते. आम्हाला कां नाही?” प्राचार्य म्हणाले, “मी कार्यालयात विचारपूस केली तेव्हा कळले शिष्यवृत्तीची आगाऊ रक्कम आली नाही.” यावर प्रा. पानतावणे यांनी तात्पुरता उपाय सुचवला, “बाबाजी (प्राचार्यांचे वडील) कडून व्याजाने घेऊन वेळ काढा.” नाही नाही म्हणता पर्यायी व्यवस्था झाल्याने आम्हाला बरे वाटले. बाबाजी दहा रुपयावर एक रुपया व्याज घ्यायचे. प्रा. गंगाधर पानतावणे लुडबुड करण्यात माहीर होते. संस्थेचे सहसचिव आयु. चंद्रमोहन वाघ यांचेकडे शिष्यवृत्ती मिळत नसल्याची मी तक्रार केली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांच्या सहकार्याने समाज कल्याण विभागाशी संपर्क साधला. तेंव्हा मिलिंद विज्ञान महाविद्यालयाला नेहमी प्रमाणे आगाऊ शिष्यवृत्तीचा धनादेश पाठवला असल्याचे कळले. तरीही विद्यार्थ्यांची अवस्था पाहून तात्काळ पर्यायी व्यवस्थेची मी समाज कल्याण अधिकाऱ्याकडे मागणी केली. अधिकाऱ्याने मागणी मंजूर केली. ते आपल्या चमूसह दुसऱ्या दिवशी महाविद्यालयात आले. स्वतः एका महिन्याच्या शिष्यवृत्तीचे वाटप केले. महाविद्यालयाचा रेकार्ड तपासला. शिष्यवृत्तीचा आगाऊ धनादेश आल्याचे व प्राचार्यांनी आपल्या वैयक्तिक खात्यात जमा केल्याचे घबाड उघड झाले. त्याचेवर संस्था अध्यक्षांनी चौकशीचे हत्यार उपसले. त्या आधीच त्यांनी महाविद्यालय व संस्था सोडली. डॉ. बाबासाहेबांच्या महाविद्यालयात शिकतांना डॉ. बाबासाहेब नव्हते तरी डॉ. बाबासाहेबांशी जवळिकता वाटायची. आपलेपणा वाटायचा. कोणीही न सांगता मंतरलेले, भारावलेले क्षण असायचे. त्यांची प्रतिमा दिसताच हृदय भरून यायचा. विद्यार्थी नतमस्तक व्हायचे. महाविद्यालयातील प्रत्येक वस्तूत डॉ. बाबासाहेबांच्या दर्शनाचा भास व्हायचा. महाविद्यालयाचे समृद्ध वाचनालय होते. मागणी केलेले पुस्तक मिळाले नाही असे कधी झाले नाही. माझा संपर्क संस्था सहसचिव आयु. चंद्रमोहन वाघ, जागतिक किर्तीचे भदंत शांतीभद्र थेरा, आयु. शंकरराव खरातांशी आला. विद्यापीठाच्या विनंतीवरून भदंत शांतीभद्र थेरा जर्मन भाषेतून मराठवाडा विद्यापीठात जर्मन भाषेतून बुद्धधम्म शिकवायचे. त्यांच्या वाचनालयात त्यांनी श्रीलंकेतून श्रीलंकेच्या परवानगीने त्रिपिटकाची हस्त लिखिते आणली. दोन्ही वाचनालयात डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ वाचता आले. नोट्स घेता आले. मी व अनेक विद्यार्थी आंबेडकरी मिशनशी जुडलो. ●●

विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064





# शिशिर ऋतुचर्या

थंडीचा शेवट आणि वसंताची चाहूल देणारा ऋतू म्हणजे शिशिर ऋतू. आयुर्वेदानुसार शिशिर ऋतू हा मराठी महिन्याप्रमाणे माघ आणि फाल्गुन महिना म्हणजेच साधारण 15 जानेवारी ते 15 मार्च या दरम्यान येतो. या काळात हवेत गारवा, धुके आणि दव जास्त असते. त्यामुळे शरीरावर त्याचा मोठा परिणाम होतो. जर या दोन महिन्यात योग्य दिनचर्या पाळली नाही तर वर्षभर आजार मागे लागतात. म्हणूनच आयुर्वेदाने या ऋतूसाठी खास ₹शिशिर ऋतुचर्य सांगितली आहे.

**शिशिरात शरीरात काय बदल होतात?**

आयुर्वेद सांगतो की प्रत्येक ऋतूत आपल्या शरीरातील तीन दोष - वात, पित्त, कफ यांचे प्रमाण बदलते.

**शिशिर ऋतूत दोन गोष्टी एकत्र होतात.**

पहिली म्हणजे हेमंतात वाढलेला अग्नी म्हणजे पचनशक्ती अजूनही तीव्र असते. थंडी असल्याने शरीरातील उष्णता आत साठते आणि अन्न उत्तम पचते.
दुसरी म्हणजे थंड वारे, धुके आणि कोरडेपणा यामुळे शरीरातील वात दोष आणि वातावरणातील थंडी मुळे कफ दोष वाढतो. यामुळे या ऋतूमध्ये वात कफ जन्य आजार त्रास देतात
शरीरात वात वाढला की सांधेदुखी, कोरडी त्वचा, निद्रानाश, बद्धकोष्ठता होते. तसेच कफ वाढला की सर्दी, खोकला, दमा, आळस येतो. म्हणून या ऋतू मध्ये वात व कफ दोष वाढणार नाही याची काळजी घ्यावी लागते त्यासाठी आहार विहार याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे

**आहार : काय खावे आणि काय टाळावे?**

शिशिर ऋतु त अग्नी तीव्र असल्याने पोटभर आणि पौष्टिक आहार घेण्याची हीच योग्य वेळ आहे. म्हणून याच ऋतूमध्ये आपण संपूर्ण वर्षभरासाठी विशेषतः उन्हाळा आणि पावसाळ्यासाठी शरीरात रोगप्रतिकारक शक्ती साठवून ठेऊ शकतो.

**या ऋतूमध्ये आहारात या पदार्थांचा समावेश करा :**

1. उष्ण आणि स्निग्ध पदार्थ : गहू, बाजरी, तीळ, गुळ, तूप, दूध, खजूर, डिंकाचे लाडू, सुका मेवा. हे पदार्थ शरीराला आतून उब देतात.
2. आले, लसूण, हिंग, ओवा, काळी मिरी, दालचिनी : हे सर्व मसाले वात-कफ कमी करतात आणि पचन सुधारतात. जेवणात यांचा वापर नक्की करा.
3. मुगाची डाळ, हरभरा, उडदाची डाळ : प्रथिनांसाठी चांगले. खिचडी हा या ऋतूतील सर्वोत्तम आहार.
4. कोमट पाणी : या ऋतुमधे दिवसभर कोमट पाणी प्यावे. थंड पाणी, आईस्क्रीम, कोलड्रिंक पूर्णपणे टाळावे. हे टाळा : दही, ताक, राजमा, वाटाणा, फ्रीज मधील थंड पाणी व अन्न, कच्च्या भाज्या आणि सलाड. हे पदार्थ कफ वाढवतात आणि पचायला जड असतात.

शिशिर ऋतू मध्ये दिनचर्या कशी असावी?

**फक्त आहार विहार नाही तर राहणीमानही महत्वाचे आहे.**

**1. अभ्यंग - तेल मालिश :** हा या ऋतूतील सर्वात महत्वाचा उपाय आहे. रोज सकाळी अंघोळीपूर्वी कोमट तिळाच्या तेलाने संपूर्ण अंगाला 10 मिनिटे मालिश करा. नंतर कोमट पाण्याने अंघोळ करा. याने त्वचेचा कोरडेपणा जातो, वात शांत होतो आणि सांधेदुखी कमी होते.

**2. व्यायाम :** आळस झटकून रोज 30 ते 40 मिनिटे व्यायाम, योगासन किंवा वॉकिंग नियमित करावे. याने शरीरातील कफ वितळतो आणि चैतन्य येते. पण अति श्रम करू नये

**3. उबदारपणा :** डोके, कान आणि पाय यांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी लोकरीचे कपडे घालावे. सकाळच्या 15 मिनिटांच्या कोवळ्या उन्हात बसल्याने व्हिटॅमिन D मिळते.

**4. झोप :** रात्री लवकर झोपा आणि सकाळी थोडा उशिरा उठा. थंडीच्या दिवसात 7 ते 8 तासांची झोप आवश्यक आहे. रात्री जागरण करू नये.

5. या दिवसात सकाळी किंवा रात्री शेकोटी पेटवून त्यासमोर बसण्याची प्रथा आजही आहे त्यामुळे थंडीपासून संरक्षण होते व शरीर उबदार राहण्यास मदत होते. या ऋतूमध्ये ज्येष्ठ नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. कारण या वयात शरीरामध्ये वात दोष नैसर्गिकरित्या वाढतो. त्यामुळे शिशिर ऋतू वाताच्या रुग्णांसाठी आव्हानात्मक असतो.

1. रोज सकाळी 1 चमचा च्यवनप्राश आणि रात्री कोमट दुधात 1 चमचा तूप घ्या.
2. सांधेदुखी असल्यास आठवड्यातून 2 वेळा गरम पाण्याची शेक घ्यावा.
3. जड व्यायाम करण्या ऐवजी प्राणायाम आणि हळू चालणे याची सवय करा.
4. बद्धकोष्ठता टाळण्यासाठी रात्री त्रिफळा चूर्ण कोमट पाण्यासोबत घ्या

**या ऋतूमध्ये शक्यतोवर या गोष्टी टाळाव्या -**

1. उपाशी राहू नका : तीव्र अग्नी असल्याने वेळेवर जेवण करा. नाहीतर वात वाढून अशक्तपणा येईल.
2. अति थंडी आणि अति उष्णता दोन्ही टाळा : एकदम गरम रूम मधून लगेच थंडीत जाऊ नये.
3. मन शांत ठेवा : थंडीत नैराश्य आणि चिंता वाढते. म्हणून रोज आनापानसती प्राणायाम व ध्यान करावे.

शिशिर ऋतू हा निसर्गाने दिलेला ‘बळ साठवण्याचा’ काळ आहे. या दोन महिन्यात जर आपण आयुर्वेदाने सांगितलेला गरम आहार, तेल मालिश, व्यायाम आणि पुरेशी विश्रांती यांचे पालन केले तर संपूर्ण वर्षभर आपले आरोग्य चांगले राहते. थंडी गेली तरी तिचे दुष्परिणाम शरीरात राहू नयेत म्हणूनच ऋतुचर्या पाळणे गरजेचे आहे.आहार विहार ऋतू चर्या यांचे योग्य पालन केल्यास आपण नेहमीसाठी स्वस्थ व निरोगी आयुष्य आनंदाने जगु शकतो. ‘स्वस्थ रहा मस्त रहा!’ ●●

आरोग्यम् सुखसंपदा



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

# देवाच्या दारात बसलेला भिकारी

## माणसांकडेच हात का पसरतो?



मंदिराच्या पायऱ्यांवर, देवळाच्या प्रवेशद्वारात किंवा एखाद्या तीर्थक्षेत्रात बसलेला भिकारी अनेकदा आपल्या नजरेस पडतो. त्याच्याकडे पाहताना मनात सहज एक प्रश्न निर्माण होतो— देवाच्या दारात बसूनही हा भिकारी देवाकडे काही मागत नाही; तो माणसांकडेच हात का पसरतो?
हा प्रश्न साधा वाटत असला, तरी त्यामागे जीवन, समाज आणि अध्यात्म यांचे गहन तत्त्वज्ञान दडलेले आहे.
धार्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर परमेश्वर हा प्रत्येकाच्या जीवनात थेट हस्तक्षेप करत नाही. त्याने माणसाला बुद्धी, विवेक, दया, करुणा आणि दान करण्याची भावना दिली आहे. त्यामुळे एखाद्या गरजू व्यक्तीची मदत करण्यासाठी देव माणसालाच माध्यम बनवतो. एखाद्या उपाशी माणसाला अन्न देणारा हात, संकटात धावून जाणारा माणूस किंवा निराधाराला आधार देणारी व्यक्ती हीच देवाची खरी कृपा असते. म्हणूनच भिकारी देवाच्या दारात बसतो, पण मदतीची अपेक्षा माणसांकडून करतो. सामाजिक वास्तवही यामागे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक भिकारी हा जन्मतः भिकारी नसतो. गरिबी, बेरोजगारी, अपंगत्व, वृद्धत्व, आजारपण, नैसर्गिक आपत्ती किंवा कुटुंबाचा आधार हरपल्यामुळे अनेकांना भीक मागण्याची वेळ येते. मंदिरात येणारे भाविक श्रद्धेने दानधर्म करतात, त्यामुळे तेथे मदत मिळण्याची शक्यता अधिक असते. म्हणून अनेक गरजू लोक देवळांच्या परिसरात बसलेले दिसतात.
मात्र या प्रश्नाचा आणखी एक पैलूही आहे. देवासमोर नतमस्तक होणारे आपण, मंदिराबाहेर बसलेल्या गरजू माणसाकडे किती संवेदनशीलतेने पाहतो? देवाला सोन्याचे मुकुट अर्पण करणारे हात एखाद्या उपाशी माणसाला अन्नाचा घास देण्यासाठी पुढे येतात का? देवाप्रती असलेली आपली श्रद्धा माणुसकीतून व्यक्त झाली, तरच ती खरी भक्ती ठरेल. संतांच्या शिकवणीतही माणसाची सेवा हीच ईश्वरसेवा मानली गेली आहे. संत तुकाराम, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित, पीडित आणि गरजूंची सेवा हीच मानवधर्म असल्याचा संदेश दिला. देवाची पूजा फुलांनी, हारांनी आणि आरतीने होते; पण देवाला सर्वाधिक प्रिय असते ती दयाळू मनाची पूजा.
याचा अर्थ असा नाही की भीक मागण्याची प्रथा योग्य आहे. समाजाने अशा व्यक्तींना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे अधिक आवश्यक आहे. भीक देण्यापेक्षा स्वावलंबनाची वाट दाखवणे ही अधिक मोठी समाजसेवा ठरते. शासन, सामाजिक संस्था आणि प्रत्येक नागरिकाने यासाठी आपापली जबाबदारी ओळखली पाहिजे.
या प्रश्नाचे उत्तर एका सुंदर वाक्यात मांडता येईल— ₹देव प्रत्येक गरजूची मदत स्वतः करत नाही; तो ती माणसांच्या हातून करवून घेतो. म्हणूनच भिकारी देवाच्या दारात बसतो, पण हात माणसांकडे पसरतो.₹
शेवटी, देव शोधण्यासाठी मंदिरात जाणे आवश्यक असेल; पण देव अनुभवण्यासाठी माणसातील माणुसकी जागी ठेवणे अधिक आवश्यक आहे. कारण करुणा, दया आणि सेवाभाव जिथे असतो, तिथेच देवाचे खरे वास्तव्य असते. ●●



उमेश चित्ते
मो.७७५८८४७१४३

11 August 2026 page 03_Layout 1 10-08-2026 05:23 PM Page 1



# कौन कहता है आसमां में सुराख नही होता!

दिल्लीच्या मध्यभागी उभारलेले जंतर-मंतर हे मुळात अठराव्या शतकात महाराजा सवाई जयसिंह द्वितीय यांनी उभारलेले खगोलशास्त्रीय वेधशाळेचे संकुल. काळाच्या ओघात या वास्तूला वेगळाच सामाजिक आणि राजकीय अर्थ प्राप्त झाला. संसदेपासून काही अंतरावर असलेली ही जागा अन्यायाचा निषेध, प्रतिकार आणि न्यायाच्या मागणीचा राष्ट्रीय मंच बनला. अण्णा हजारे यांचे जनलोकपाल आंदोलन, निर्भयाला न्याय मिळावा यासाठीचा जनक्षोभ, वन रँक वन पेन्शनसाठीचा माजी सैनिकांचा लढा, तमिळनाडूच्या शेतकऱ्यांचे आंदोलन, विद्यार्थ्यांचे संघर्ष, नागरिकत्व कायद्याविरोधातील निदर्शने आणि महिला कुस्तीपटूंची न्यायासाठीची झुंज या सर्वांनी जंतर-मंतरला भारतीय लोकशाहीच्या संघर्षाचा साक्षीदार बनवले. याच परंपरेत स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब आणि रोजगाराच्या अनिश्चिततेने त्रस्त युवकांच्या आंदोलनाने जंतर-मंतर पुन्हा एकदा गजबजले. १५ मे २०२६ रोजी भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान बेरोजगार तरुणांची तुलना ‘झुरळांशी’ करणारे वक्तव्य केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आणि त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. अमेरिकेत शिक्षण घेणारे अभिजित दिपके यांनी या नाराजीला उपरोधिक वळण देत, “सर्व झुरळे एकत्र आली तर काय होईल?” अशी पोस्ट केली. त्याला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादातून ‘कॉकरोच जनता पार्टी’ CJP ही डिजिटल चळवळ आकाराला आली. अपमानास्पद ठरवला गेलेला ‘झुरळ’ हा शब्दच त्यांनी प्रतिकार, एकजूट आणि आत्मसन्मानाचे प्रतिक बनवला. इन्स्टाग्राम, एक्स, यूट्यूब अशा माध्यमांतून विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे युवक, बेरोजगार आणि पालक या चळवळीशी जोडले गेले. अल्पावधीत डिजिटल अभियानाचे रूपांतर जनआंदोलनात झाले. अभिजित दिपके भारतात परतले आणि विविध शहरांतील स्थानिक कार्यकर्त्यांशी संपर्क साधत आंदोलनाचा विस्तार केला. ६ जून २०२६ रोजी जंतर-मंतरवर पहिले मोठे आंदोलन झाले. त्यानंतर पुणे, लखनौ, अमृतसर, जयपूर, नागपूर, बंगळुरू अशा शहरांमध्ये समर्थनार्थ सभा आणि निदर्शने झाली. २० जून रोजी पुन्हा जंतर-मंतरवर व्यापक आंदोलनाची हाक देण्यात आली. ‘रोजगार हा अधिकार आहे’, ‘परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार थांबवा’, ‘युवकांचा अपमान सहन केला जाणार नाही’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला एकाच विचारधारेची चौकट नव्हती. ‘इन्कलाब जिंदाबाद’, ‘जयभीम’, ‘वंदे मातरम्’, ‘सावित्री तेरी लड़ाई नहीं रहेगी अधूरी’, ‘पितृसत्ता से आजादी’, ‘धर्मेंद्र प्रधान का राजीनामा’ अशा विविध घोषणांनी एकाच वेळी अनेक प्रश्नांना आवाज दिला. या विविधतेतून अन्याय, बेरोजगारी, शिक्षणव्यवस्थेतील अनियमितता आणि सामाजिक विषमतेविरुद्धची एका पिढीची अस्वस्थता दिसत होती. या घोषणांमध्ये संविधानावरील विश्वासाचा स्वरही प्रकर्षाने जाणवत होता. ‘जयभीम’ हा शब्द विशिष्ट वर्गापुरता मर्यादित न राहता तरुणांच्या स्वाभिमानाचा बुलंद उच्चार बनताना दिसला. हातातील संविधान, डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमा आणि घोषणांमधून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांवरील निष्ठा व्यक्त होत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ फलकांवर नव्हते; प्रश्न विचारण्याच्या निर्भय वृत्तीतही ते जिवंत दिसत होते. या आंदोलनातील तरुण मुलींचा सहभाग विशेष लक्षवेधी होता. ‘लाडावलेल्या’, ‘नट्टापट्ट्यात रमलेल्या’ किंवा ‘रिल्सच्या जगात हरवलेल्या’ म्हणून ज्या जेन-झी मुलींची टिंगल केली जाते, त्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून आपले सामाजिक आणि राजकीय भान दाखवून दिले. बंगळुरूमधील आफरीन या CJPच्या प्रवक्त्याचा सहभाग आणि हजारो तरुणींची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. ‘Baddies are not apolitical’, ‘Baddies lead the chaos’ अशा फलकांपासून ते लोकशाही, रोजगार आणि न्यायाविषयीच्या घोषणांपर्यंत त्यांची भाषा बिनधास्त होती. ऊन, पाऊस, पोलिसांचा दबाव, लाठीचार्ज, अश्रुधूर, अटक किंवा एफआयआर यांची पर्वा न करता त्या मैदानात उभ्या राहिल्या. एका लहान मुलीच्या हातातील ‘Let me dream, let me grow, save my future’ हा फलक असो किंवा पोलिसांच्या लाठीपासून मुलांना वाचवण्यासाठी पुढे सरसावलेल्या तरुणी असोत, या दृश्यांत आंदोलनाची मानवी बाजू स्पष्ट दिसत होती. अल्पवयीन विद्यार्थिनींपासून सत्तरीच्या आजीपर्यंत आणि आपल्या लहान मुलांना घेऊन आलेल्या मुस्लिम महिलांपर्यंत स्त्रियांच्या अनेक पिढ्या येथे एकत्र आल्या होत्या. एका




हाताने पोलिसांची गाडी अडवून उभी राहिलेली रिया यादव मुंबईतील आंदोलनाची प्रेरणा ठरली. स्त्रीचा हा लढाऊ वारसा नवा नाही. सावित्रीबाई फुले, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांनी शिक्षण, समता आणि हक्कांसाठी स्त्रियांना संघर्षाची दिशा दिली. स्वातंत्र्यलढ्यापासून शाहीनबाग, मणिपूर, संदेशखली, महिला कुस्तीपटूंचे आंदोलन आणि केन-बेतवा प्रकल्पाविरोधातील आदिवासी स्त्रियांचा संघर्ष; अन्यायाच्या प्रत्येक नव्या रूपासोबत स्त्रियांनी प्रतिकाराची नवी भाषा शोधली आहे. जंतर-मंतरवरील मुलींच्या भाषेतही हा प्रतिकार दिसला. काहीवेळा त्यांनी भाषेच्या प्रस्थापित मर्यादाही ओलांडल्या. त्यामागे केवळ उद्धटपणा नव्हता; दीर्घकाळ साचलेला असंतोष, उपेक्षा आणि ‘आम्हाला ऐकले जात नाही’ या भावनेचा उद्रेक होता. पुरुषाचा आक्रमकपणा नेतृत्वाचे लक्षण मानणारा समाज स्त्रीच्या संतापाला मात्र असंस्कृतपणा म्हणतो. त्यामुळे तिच्या प्रश्नांपेक्षा तिच्या भाषेची चर्चा होणे ही देखील पितृसत्ताक मानसिकतेचीच खूण आहे. अर्थात, भाषेच्या स्वातंत्र्यासोबत सार्वजनिक संवादाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.



डॉ सुनंदा बोरकर जुलमे
मो. 8766422475

जंतर-मंतरच्या आंदोलनाकडे केवळ शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी म्हणून पाहणे त्याचे स्वरूप संकुचित करणारे ठरेल. पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ हा केंद्रस्थानी असलेला प्रश्न होता. पेपरफुटीग्रस्त विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई, पुनर्परीक्षा, वयोमर्यादा ओलांडणाऱ्यांना सवलत, परीक्षा व्यवस्थेतील मूलभूत सुधारणा आणि आंदोलनकर्त्यांवरील कारवाई मागे घेणे अशा मागण्याही पुढे आल्या. पेपरफुटीमुळे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी, ही मागणी आंदोलनाच्या मानवी संवेदनशीलतेची जाणीव करून देणारी होती. आता या आंदोलनासमोर सर्वांत मोठे आव्हान आहे. रस्त्यावरचा आक्रोश सातत्यपूर्ण लोकशाही दबावात आणि विधायक कृतीत रूपांतरित करण्याचे. आंदोलन संपले तरी प्रश्न संपलेले नाहीत. पालक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि सामान्य नागरिकांना सोबत घेऊन शिक्षणव्यवस्थेतील बदलांची व्यापक चळवळ उभी करावी लागेल. डिजिटल माध्यमांचा उपयोग केवळ घोषणांसाठी नव्हे, तर विद्यार्थी अहवाल, धोरणांचे मसुदे, सार्वजनिक संवाद आणि लोकशाही मार्गाने दबाव निर्माण करण्यासाठी व्हायला हवा. जंतर-मंतरवरील आंदोलन संपले आहे. घोषणा थांबल्या, तंबू आवरले गेले आणि तरुणाई आपापल्या शहरांकडे परतली. पण त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न इतक्या सहजपणे संपणारे नाहीत. ही तरुणाई केवळ घोषणांसाठी जमलेली गर्दी नाही; ती व्यवस्थेच्या बथ्थड भिंतीवर हात ठेवून तिची पायाभरणी तपासणारी अस्वस्थ पिढी आहे. तिच्या आवाजात आक्रोश आहे; पण त्याहून महत्त्वाची आहे बदलाची आकांक्षा. दुष्यंतकुमारांच्या शब्दांत, “कौन कहता है आसमाँ में सुराख़ नहीं होता, एक पत्थर तो तबीयत से उछालो यारो.” जंतर-मंतरवरील तरुणाईने तो दगड भिरकावला आहे. आता तो किती उंचावर जातो आणि कोणते आकाश हादरवतो, हे काळच ठरवणार आहे.●●

## खोट्याची मर्यादा

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

झूठ कागज की उस नाव की तरह है, जो पानी में थोड़ी दूर तो चल सकती है, लेकिन टिक नहीं सकती.! जीवनात आपण अनेक प्रकारची माणसे भेटतो. काही सत्याच्या भक्कम पायावर उभी असतात, तर काही खोट्याच्या आधारावर स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करत असतात. पण एक गोष्ट मात्र काळाच्या कसोटीवर वारंवार सिद्ध झाली आहे. खोटे कितीही आकर्षक असले कितीही चतुराईने मांडले गेले तरी त्याचे आयुष्य फार मोठे नसते. कागदाची नाव पाण्यावर तरंगताना पाहिली आहे ना? सुरुवातीला ती अगदी छान वाटते. हलक्या लाटांवर डोलत पुढेही जाते. पण जसजसं पाणी तिच्या अंगात मुरू लागते, तसतशी तिची ताकद संपत जाते आणि शेवटी ती विरघळून बुडते. खोट्याचंही तसेच असते. काही काळासाठी ते यशस्वी झाल्यासारखे वाटते, लोक त्यावर विश्वासही ठेवतात; पण सत्याचे पाणी त्याला स्पर्श करू लागताच त्याचा खरा चेहरा समोर येतो. मित्रांनो, खोटे बोलण्यासाठी उत्तम स्मरणशक्ती लागते, कारण एक खोटे झाकण्यासाठी अनेक खोटी निर्माण करावी लागतात. पण सत्याला अशा आधारांची गरज नसते. सत्य शांत असते संयमी असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे ते स्वतःच स्वतःचा पुरावा बनते. म्हणूनच सत्याचा प्रवास कदाचित संथ असेल, पण तो स्थिर आणि चिरंतन असतो. आजच्या धावपळीच्या जगात तात्पुरत्या फायद्यासाठी अनेकदा असत्याचा मार्ग स्वीकारला जातो. परंतु त्या क्षणिक यशाची किंमत विश्वास गमावून मोजावी लागते. पैसा, पद किंवा प्रतिष्ठा पुन्हा मिळू शकते; पण एकदा तुटलेला विश्वास पुन्हा जुळवण्यासाठी खूप मोठी किंमत मोजावी लागते. म्हणून आपल्या प्रत्येक शब्दात आणि प्रत्येक कृतीत सत्याची साथ ठेवूया. कारण खोटे काही काळ लोकांना फसवू शकते, पण सत्याला हरवू शकत नाही. अखेरीस जिंकतो तो सत्याचाच मार्ग. म्हणूनच जीवनाचा पाया खोट्यावर नव्हे, तर सत्य, प्रामाणिकपणा आणि विश्वासावर उभारूया. तेव्हाच आपले व्यक्तिमत्त्व काळाच्या प्रत्येक लाटेला समर्थपणे तोंड देईल आणि आयुष्याची नाव सुरक्षितपणे किनाऱ्यापर्यंत पोहोचेल.●● बहुजन सौरभ

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### प्रबोधनात्मक, ऐतिहासिक आणि वर्तमान काळातील तंत्रज्ञानावर आधारित लेख

मा. संपादक नेहमी प्रमाणे आज सुद्धा, दि.७ ऑगष्ट २०२६, दै.बहुजन सौरभ मधील सगळेच जवळपास दहा लेख अतिशय सुंदर आहेत. इतके प्रबोधनात्मक, ऐतिहासिक आणि वर्तमान काळातील तंत्रज्ञानावर आधारित लेख भांडवलवादी व्यावसायिक वृत्तपत्रांमध्ये सुद्धा प्रसिद्ध होत नाहीत. प्रसिद्ध वरिष्ठ पत्रकार आणि लेखक भूपेंद्र गणवीर यांचा लेख संशोधनाचे आणि चिंतनाचे नवीन वास्तव मांडणारा आहे. अण्णासाहेब सावंत यांचा लेख सरकारच्या धोरणाची पोलखोल करणारा असून नव्या आंदोलनाची दिशा स्पष्ट करणारा आहे. या शिवाय अशोक भरणे, हरिदास भिसे, लता प्रतिभा मधुकर, नेहा गोडघाटे, शारदा मोटघरे, मंदाकिनी काकडे, मीनाक्षी दमयंती, पद्मा बहादुरे, शारदा मोटघरे यांचे लेख सुद्धा शब्दांच्या अग्नीफुलांनी शस्त्रसज्ज झाले आहेत.

– पुरूषोत्तम संबोधी

### संबोधी साहेबांचे धन्यवाद.

माझा लेख त्यांच्या पसंतीस उतरला. संध्याताई राजूरकर मॅडम यांच्या सहकार्याने आणि बहुजन सौरभ पेपरच्या माध्यमातून आपल्या मनातील विचार व्यक्त करता येतात. याबद्दल संपादकीय संध्याताई यांचे खूप खूप आभार.

–मंदाकिनी काकडे

### धन्यवाद दै.बहुजन सौरभ

मा. संपादक ‘बांबूपासून तयार होणारे साहित्य’ या माझ्या लेखाला आजच्या अंकात स्थान दिल्याबद्दल आपले मनः पूर्वक धन्यवाद. त्याचप्रमाणे आपल्या संपूर्ण टिमचे मनापासून आभार धन्यवाद दै.बहुजन सौरभ. आपल्या वृतपत्राच्या माध्यमातून या माझ्या लेखातून अनेकांना माहिती वाचायला मिळेल. समोरही आपल्या वृतपत्रात अशीच साहित्य सेवा करण्याची मला संधी मिळो हीच इच्छा!●●

-संगीता संतोष ठलाल

# वैचारिक शहाणपण म्हणजेच आंबेडकरवाद!

बंदुक देना असान हैं, किंतू बुद्धी देना कठीण आधी स्वातंत्र्य की सामाजिक परिवर्तन, या वादात ब्रिटिश चले जावच्या चळवळीत उभा देश महात्मा गांधींच्या पाठी उभा असताना एका पत्रकाराने प्रश्न विचारला. तुम्ही एकटे गांधीजींच्या विरोधात जाऊन काय साध्य करीत आहात? त्याला उतर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, भारत वर्षातील तरुण वर्ग शिक्षणाने जागृत होईल तेव्हा त्याला देशाचा खरा नेता कोण आणि कोणत्या विचारधाराने देशाची प्रगती होणार हे काळ ठरविणार आहे? डॉ. बाबासाहेब यांनी तरुण पिढीला समाजाच्या आणि देशाच्या परिवर्तनाचा मुख्य कणा मानले आहे. भविष्यात तरुण पिढी अंधश्रद्धा सोडून, स्वाभिमान आणि विज्ञानाची कास धरून समाजात, देशात सकारात्मक बदल घडवून आणेल. याचा त्यांना आत्मविश्वास होता. याची प्रचिती स्वातंत्र्याच्या केवळ ७९ वर्षात आली. भारत वर्षातील विद्यार्थ्यांनी सरकारच्या शिक्षणधोरण आणि पेपर फुटी शिक्षमंत्री विरोधात जंतर मंतर आंदोलन करून शिक्षमंत्री प्रधान यांना राजीनामा देण्यास भाजप सरकारला भाग पडले. भारत वर्षातील या आंदोलनात संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आणि जय जयभीमचा नारा गुंजला. म्हणून आंबेडकरवादाचा नेमका अर्थ काय हे भारतीयांनी समजून घेण्याची खरी गरज आहे. हजारो युगे काळाच्या पुढे असलेला क्रांतिकारी परिवर्तनवादी विचार म्हणजे आंबेडकरवाद हा मार्क्सवाद, गोळवलकरवाद, सावरकरवाद आणि गांधीवाद याला पुरून उरला आहे. जयभीम हा फक्त भारतच नाही तर समता मूलक जगाचा श्वास बनला असून वैचारिक शहाणपण म्हणजेच आंबेडकरवाद आहे. आंबेडकरवाद कुण्या धर्माशी, जातीशी, पंथाशी, भाषा आणि प्रांत यांच्याशी निगडित नाही. तर आंबेडकरवाद हा मानव मुक्तीचा विचार असून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा विचार आहे. गुलामी, सरंजामशाही, हुकूमशाही, धर्मांधशक्ती नाकारून माणसाला स्वाभिमान, आत्मसन्मान व स्वयं प्रकाशाकडे घेऊन जाणारा वैज्ञानिक मार्गदाता म्हणजे आंबेडकरवाद होय.

आंबेडकरवादाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे समानता आणि बंधुता असून प्रत्येक माणसाला समान दर्जा आणि आदर मिळाला तर त्याचा वैज्ञानिक आणि विवेकवादी दृष्टिकोन जागृत झाला की अंधश्रद्धा, जातीभेद बाजूला सारून बुद्धिनिष्ठ आधुनिक विचार स्वीकारणे म्हणजे आंबेडकरवाद होय. शिक्षण हेच प्रगतीचे साधन मानून वंचित घटकांना सक्षम करण्याचे ध्येय म्हणजे आंबेडकरवाद आहे. समातमूलक विचारांवर, सिद्धातांवर आधारित एक तत्त्वज्ञान, जीवनप्रणाली या विचारप्रणालीत आंबेडकरवाद सामावलेला आहे. हे वैचारिक शहाणपण येण्यासाठी आंबेडकरवादी विधाने विद्यार्थ्यांसाठी अत्यंत समर्पक आणि अचूक आहेत. विद्यार्थ्यांमध्ये मानवी मुक्तीचे, समतेचे आणि विवेकवादाचे सर्वोच्च वैचारिक शहाणपण येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदेश देतात की ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’



आनंद म्हस्के
मो. 8652325032




शिकलेल्या तरुणांनी संघटित होऊन अन्याय, विषमता विरुद्ध संघर्ष केला पाहिजे. तरुणांनी नशिबावर नव्हे तर स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवला पाहिजे. तरुणांना नशीब, अंधश्रद्धा आणि दैववादाच्या चक्रातून बाहेर पडण्याचे आवाहन करताना डॉ. बाबासाहेब म्हणतात की, ‘जर आकाशातील ग्रह आणि तारे माझे भविष्य ठरवणार असतील, तर माझ्या मेंदूचा आणि माझ्या मनगटाचा काय उपयोग?’ या विचारातून त्यांनी स्पष्ट केले की, तरुणांनी स्वतःच्या बुद्धीवर आणि कष्टांवर विश्वास ठेवून आपले भविष्य स्वतः बदलले पाहिजे. चारित्र्य आणि स्वाभिमान जपताना केवळ बुद्धी असणे पुरेसे नाही, तर त्याला शील आणि नैतिकतेची जोड असणे आवश्यक आहे. करण स्वाभिमानाशिवाय माणूस मृतसमान आहे. नुसत्या पदव्या आणि पैसा मिळवून जर समाजात स्वतःचा आदर आणि स्वाभिमान टिकवता येत असेल तर त्या प्रगतीला काही अर्थ राहत नाही. आपल्या समाजातील तरुणांनी उच्च शिक्षण घेतल्यानंतर केवळ स्वतःचा स्वार्थ किंवा कुटुंबाचा विकास न पाहता, समाजातील शोषित, गरीब आणि वंचित घटकांच्या उद्धारासाठी काम केले पाहिजे. वैयक्तिक सुखापेक्षा सामाजिक बांधिलकीला मोठे मानले पाहिजे. माणसा-माणसात भेद करणाऱ्या रूढी-परंपरांचा त्याग केला पाहिजे. विज्ञानाची कास धरून, समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही लोकशाहीची मूल्ये रुजविली पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते तरुण हा बदलाचा मुख्य स्त्रोत असून. तरुणांनी स्वतः सुशिक्षित होऊन, संघटित शक्तीच्या जोरावर देशातून सामाजिक विषमता नष्ट करावी आणि एक प्रगत, समतावादी समाज निर्माण करावा, अशी त्यांची अपेक्षा होती. वैचारिक शहाणपण म्हणजेच आंबेडकरवाद हे जगाने मान्य केले असले तरी आंबेडकरवादी नेत्यात वैचारिक शहाणपनाचा अभाव असल्याने आंबेडकरवादी विचाराची सत्ता प्रस्थापित होताना दिसत नाही. हेच आंबेडकरवादाचे दुर्दैव आहे.●●

# न्यायव्यवस्थेतील सामाजिक प्रतिनिधित्व

### न्यायव्यवस्थेतील सामाजिक प्रतिनिधित्व सर्वसमावेशकता आणि पारदर्शकतेचे आव्हान करिया मुंडा समिती, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग आणि सद्यस्थितीचे सविस्तर विश्लेषण...

भारतीय लोकशाहीचा तिसरा आणि अत्यंत महत्त्वाचा स्तंभ म्हणजे न्यायव्यवस्था. राज्यघटनेची अंमलबजावणी करणे, नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे आणि समतेवर आधारित समाज निर्माण करणे ही न्यायव्यवस्थेची सर्वोच्च जबाबदारी आहे. परंतु, गेल्या काही दशकांपासून भारताच्या उच्च न्यायव्यवस्थेमध्ये (High Courts आणि Supreme Court) सर्व सामाजिक घटकांचे, विशेषतः अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्गीयांचे (OBC) पुरेसे प्रतिनिधित्व आहे का? हा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात आहे. 'न्यायव्यवस्थेतील आरक्षण' (Reservation in Judiciary) हा केवळ नोकरीचा किंवा रोजगाराचा विषय नसून, तो देशातील न्याय प्रणालीची विश्वासार्हता, सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायाशी थेट जोडलेला अत्यंत संवेदनशील विषय आहे.

**२. संसदीय समित्या आणि घटनात्मक आयोगांच्या शिफारसी व महत्त्वाच्या तारखा :** न्यायव्यवस्थेतील विविधतेच्या अभावाबद्दल आणि सामाजिक प्रतिनिधित्वाच्या कमतरतेबद्दल वेळोवेळी उच्चस्तरीय घटनात्मक संस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. या संदर्भात संसदीय समिती म्हणून काम करणारी करिया मुंडा समिती आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (NCSC) यांचे अहवाल अत्यंत महत्त्वाचे आणि ऐतिहासिक दस्तऐवज आहेत.

करिया मुंडा समितीचा अहवाल (१५ मार्च २०००) : अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी गठीत करण्यात आलेल्या या संसदीय समितीने आपला ऐतिहासिक अहवाल १५ मार्च २००० रोजी संसदेसमोर सादर केला होता. या अहवालात देशातील उच्च न्यायव्यवस्थेत मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षण किंवा योग्य प्रतिनिधित्व देणारी ठोस व्यवस्था लागू करण्याची जोरदार शिफारस करण्यात आली होती.

**राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचा अहवाल (११ डिसेंबर २०१४) :** याच मुद्द्याला पुढे नेत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने (NCSC) उच्च न्यायव्यवस्थेतील नियुक्ती प्रक्रियेवर आणि आरक्षणाच्या नियमांच्या उल्लंघनावर चिंता व्यक्त करणारा आपला विशेष अहवाल ११ डिसेंबर २०१४ रोजी प्रसिद्ध केला होता. या दोन्ही उच्च घटनात्मक संस्थांनी आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे की, देशातील दोन प्रमुख उच्च न्यायालये, दिल्ली हायकोर्ट आणि बॉम्बे हायकोर्ट अशी न्यायालये आहेत. जिथे आजपर्यंत कोणत्याही श्रेणीमध्ये किंवा कोणत्याही उच्च पदावर सामाजिक आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. इतर काही राज्यांच्या हायकोर्टांमध्ये कनिष्ठ पातळीवर (Subordinate Judiciary) किंवा प्रशासकीय पदांवर कमी-अधिक प्रमाणात आरक्षण दिलेले असले, तरी तिथेही या धोरणांचे काटेकोर आणि योग्य पालन होत नसल्याचे चित्र समोर आले आहे.




**३. बॉम्बे हायकोर्ट :** आरक्षणाची मागणी आणि प्रशासकीय दृष्टिकोन बॉम्बे हायकोर्टामध्ये न्यायिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही स्तरांवर आरक्षणाचे धोरण प्रभावीपणे लागू करण्यासाठी विविध सामाजिक संघटनांकडून आणि जागरूक नागरिकांकडून दीर्घकाळापासून निवेदने आणि मागण्या केल्या जात आहेत. असे असतानाही, हायकोर्टाच्या केवळ प्रशासकीय पदांवर (Administrative Posts) देखील आरक्षणाचा हक्क मान्य करण्यात आलेला नाही. याच अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि कायदेशीर आव्हान देण्यासाठी विकास गौर आणि इतर सहकाऱ्यांनी हायकोर्टात एक जनहित याचिका (PIL) दाखल केली होती. या याचिकेद्वारे बॉम्बे हायकोर्टाच्या प्रशासकीय विभागातील नोकरभरतीत आरक्षणाच्या घटनात्मक तरतुदींचे पालन व्हावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली होती. परंतु, बॉम्बे हायकोर्टाने ही याचिका केवळ तांत्रिक कारणांचा आधार घेऊन फेटाळून लावली. याचिकाकर्ते स्वतः त्या पदाचे उमेदवार नाहीत किंवा ते थेट बाधित पक्ष नाहीत, असा आक्षेप घेत न्यायालयाने त्यांची याचिका तर फेटाळलीच, शिवाय त्यांच्यावर १०० रुपयांचा दंड (Cost) देखील ठोठावला. ही घटना अत्यंत खेदजनक असून ती न्यायव्यवस्थेच्या मानसिकतेवर प्रकाश टाकते. जनहिताशी आणि सामाजिक प्रतिनिधित्वाशी जोडलेल्या एवढ्या मोठ्या विषयाला तांत्रिकतेच्या चौकटीत अडकवून दंड आकारणे, हे भविष्यात शोषित समाजातील नागरिकांना न्यायालयाचे दरवाजे खटखटावण्यापासून हतोत्साहित करणारे ठरते. या संदर्भात राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने बॉम्बे हायकोर्टाला नोटीस बजावून उत्तरही मागितले होते, परंतु न्यायालयाने त्यावर अपेक्षित आणि संवेदनशील प्रतिसाद दिलेला नाही.

**४. 'द वायर' (The Wire) चा अहवाल :** न्यायव्यवस्थेतील अंतर्विरोध बॉम्बे हायकोर्टातील सामाजिक प्रतिनिधित्वाचा हा अभाव आणि प्रशासकीय उदासीनतेचा मुद्दा स्वतंत्र पत्रकारिता पोर्टल 'द वायर' ने अत्यंत सविस्तरपणे समोर आणला आहे. 'द वायर'च्या शोधपत्रकारितेमुळे हा विषय केवळ राज्याचा न राहता राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आला. माध्यमांच्या या अहवालात न्यायव्यवस्थेतील अंतर्गत अंतर्विरोधांवर तीव्र प्रहार करण्यात आले आहेत :-

घटनात्मक उत्तरदायित्वाचा अभाव : राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (NCSC) सारख्या घटनात्मक संस्थेने नोटीस बजावल्यानंतरही हायकोर्टाच्या प्रशासकीय शाखेने त्यावर मौन बाळगणे, हे संस्थात्मक उत्तरदायित्वाच्या तत्त्वाला हरताळ फासणारे आहे, हे 'द वायर'ने ठळकपणे अधोरेखित केले.

**दुटप्पी भूमिका :** लोकशाहीतील इतर स्तंभांना पारदर्शकतेचा आणि समतेचा धडा शिकवणारी न्यायव्यवस्था स्वतःच्या अंतर्गत भरती प्रक्रियेत आणि सामाजिक न्यायाच्या बाबतीत मात्र कमालीची अपारदर्शक आणि बचावात्मक भूमिका घेते, हा दुटप्पीपणा या अहवालातून उघड झाला.

**दंड आकारण्याच्या वृत्तीवर टीका :** जनहित याचिका दाखल करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांवर दंड लादणे ही न्यायालयाची वृत्ती तळागाळातील लोकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न आहे, असे मत या वृत्तात मांडण्यात आले.

**५. माहितीचा अधिकार (RTI) आणि पारदर्शकतेचा अभाव :** जब व्यवस्थेतील सुधारणांची गती मंदावते, तेव्हा माहितीचा अधिकार (RTI) हे नागरिकांच्या हाती एक महत्त्वाचे शस्त्र ठरते. याच अधिकाराचा वापर करून बॉम्बे हायकोर्टात आरक्षणाच्या सद्यःस्थितीबाबत माहिती मागवण्यात आली होती. आरटीआयच्या उत्तरात हायकोर्टाने हे मान्य केले की, या विषयावर विचार करण्यासाठी न्यायालयाने एका अंतर्गत समितीची (Committee) स्थापना केली आहे. परंतु, जेव्हा या समितीमध्ये कोणकोणते सदस्य आहेत, त्यांची कार्यपद्धती काय आहे आणि ही समिती कधीपर्यंत आपला अहवाल सादर करणार, अशी सविस्तर माहिती मागवण्यात आली, तेव्हा हायकोर्टाने ही माहिती देण्यास साफ नकार दिला. सर्वोच्च आणि उच्च न्यायालये वारंवार देशातील इतर संस्थांना पारदर्शकता आणि 'माहितीचा अधिकार' यावर मार्गदर्शन करत असतात. मात्र, जेव्हा स्वतःच्या अंतर्गत सुधारणांचा आणि सामाजिक आरक्षणाचा प्रश्न येतो, तेव्हा ही माहिती 'गोपनीय' ठेवली जाते. जर देशातील न्याय देणारी सर्वोच्च संस्थाच अशा प्रकारे अपारदर्शक पद्धतीने काम करणार असेल, तर सामान्य जनतेने पारदर्शकतेची अपेक्षा कोणाकडून करावी, हा मोठा यक्षप्रश्न निर्माण होतो. 'न्याय केवळ केला जाऊ नये, तर तो केला गेल्याचे स्पष्ट दिसले पाहिजे. जेव्हा न्यायव्यवस्थेची रचनाच सर्वसमावेशक नसेल, तेव्हा तिच्या निर्णयांकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित होऊ शकतो. म्हणूनच न्यायालयाची विश्वासार्हता टिकवण्यासाठी आरक्षण अनिवार्य आहे.'

**६. न्यायालयीन निर्णयांचा प्रभाव आणि विश्वासार्हतेचे संकट :** ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले तर, देशात जिथे जिथे आरक्षण धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये अडथळे आले आहेत, तिथे अनेकदा न्यायालयांचे आदेश आणि संकुचित कायदेशीर व्याख्या कारणीभूत ठरल्याचे दिसते. आज भारतातील सामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास काही प्रमाणात डळमळीत होत चालला आहे, यामागे न्यायालयांची असर्वसमावेशक रचना हे एक प्रमुख कारण आहे. अलीकडच्या काळातील अनेक मोठे आणि संवेदनशील विषय, मग ते राजकीय पक्षांच्या फुटीचे वाद असोत, भूमी आणि सामाजिक आस्थेचे प्रश्न असोत, शेतकरी आंदोलनाशी संबंधित मुद्दे असोत, की सरकारचे मोठे धोरणात्मक निर्णय असोत, या सर्व प्रकरणांमध्ये न्यायालयांची भूमिका अनेकदा सत्तेच्या आणि सरकारच्या बाजूने झुकलेली असल्याचा समज जनमानसात दृढ होत चालला आहे. न्यायालयांची प्रतिमा स्वतंत्र, निष्पक्ष आणि लोकभिमुख असण्याऐवजी ती सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम करणारी संस्था अशी बनत चालली आहे. न्यायालयांमध्ये विविध सामाजिक स्तरांतील न्यायाधीशांचा भरणा नसल्यामुळेच जनसामान्यांच्या भावना आणि जमिनीवरील वास्तविकता समजून घेण्यात न्यायालय कमी पडत आहे, अशी टीका आता उघडपणे होत आहे.

**सर्वसमावेशकता हीच विश्वासार्हतेचा आधार :** कोणत्याही निरोगी लोकशाहीमध्ये न्यायव्यवस्थेची निष्पक्षता हीच तिची ताकद असते. न्यायव्यवस्थेची डागाळलेली प्रतिमा सुधारण्याचा आणि तिच्यावरील लोकविश्वास पुनर्स्थापित करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे न्यायव्यवस्थेला अधिक सर्वसमावेशक (Inclusive) बनवणे हाच आहे. जोपर्यंत समाजातील सर्वात वंचित, शोषित आणि मागास घटकातून आलेले प्रतिनिधी न्यायालयाच्या सर्वोच्च आसनांवर विराजमान होत नाहीत, तोपर्यंत न्यायालयीन निर्णयांमध्ये सामाजिक वास्तवाची खरी संवेदनशीलता उमटणे कठीण आहे. त्यामुळेच, १५ मार्च २००० चा करिया मुंडा समितीचा अहवाल आणि ११ डिसेंबर २०१४ चा राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचा अहवाल यांवर संसदेत आणि जाहीर व्यासपीठांवर तातडीने आणि गंभीर चर्चा झाली पाहिजे. न्यायव्यवस्थेच्या प्रत्येक स्तरावर, मग ती न्यायिक पदे असोत की प्रशासकीय पदे, आरक्षणाचे धोरण तातडीने आणि प्रामाणिकपणे लागू केले पाहिजे. जेव्हा न्यायालयाच्या आत प्रत्येक वर्गाचा आवाज आणि अस्तित्व असेल, तेव्हाच भारतीय न्यायव्यवस्था आपली खरी साख टिकवून ठेवू शकेल आणि देशातील शेवटच्या नागरिकाला तिथून खऱ्या न्यायाची अपेक्षा ठेवता येईल.

**संदर्भः** करिया मुंडा समिती अहवाल (संसदेत सादर : १५ मार्च २०००). राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (NCSC) विशेष अहवाल (प्रसिद्धी तारीख : ११ डिसेंबर २०१४). 'द वायर' (The Wire) विशेष शोधनिबंध व वृत्त अहवाल. माहितीचा अधिकार (RTI) अर्ज व जनहित याचिका (PIL) संदर्भ.●●

मंगळवार ११ ऑगस्ट २०२६
Tuesday 11 August 2026
बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA


# जिंदगी है कितनी खूबसूरत'च्या सुरेल सादरीकरणातून...

## जाईबाई चौधरी ज्ञानपीठात धम्ममय गुरुपौर्णिमा महोत्सव

**नागपूर :** जाईबाई चौधरी ज्ञानपीठाच्या संशोधन विभागाच्यावतीने गुरुपौर्णिमेनिमित्त धम्ममय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'जिंदगी है कितनी खूबसूरत' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात धम्मदेसना, संगीत, गीत, नृत्य, नाट्य आणि बालकलाकारांच्या सादरीकरणातून गुरु परंपरा व धम्ममार्गाचे महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानपीठाच्या संस्थापिका जाईबाई चौधरी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनानुसार जाईबाई चौधरी यांनी १९२२ मध्ये मुलींसाठी कन्या शाळेची स्थापना केली होती. त्यांच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित सांस्कृतिक प्रबोधन मालिकेतील हा सहावा कार्यक्रम होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन संस्थेचे संचालक आचार्य सुधाकर चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून लेखक, चिंतक व धम्मगुरू महानाग रत्न, 'बहुजन सौरभ'च्या निवासी संपादक प्रा. संध्या राजूरकर, ज्येष्ठ पत्रकार आनंद डेकाटे, मैत्री चॅनल-सोशल मीडियाचे संचालक वामन सोमकुंवर, डॉ. शिल्पा पझारे आणि प्रभा चौधरी उपस्थित होते. आचार्य सुधाकर चौधरी यांनी प्रास्ताविकातून गुरु परंपरेचा संक्षिप्त



इतिहास, 'गुरू म्हणजे काय?' याची संकल्पना तसेच तथागत बुद्धांच्या गुरु विषयक धम्मदेसनेचे विवेचन केले. सम्यक संबुद्धांनी प्रतित्यसमुत्पादाच्या तत्त्वावर आधारित दुःखमुक्तीचा आणि सुखी जीवनाचा अष्टांग मार्ग दिला. धम्ममार्ग जीवनाचा आधार बनल्यास जीवन अधिक सुंदर, समृद्ध आणि शांततामय होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान सर्व शिक्षक, विद्यार्थी, अतिथी व कर्मचारी ध्यानसाधनेत असताना सुचित्रा डंभारे व कलावंतांनी 'रात्र अंधारली, शुद्ध गंधारली, बुद्ध ही पौर्णिमा, धम्म मग जाहला' हे सुमधुर गीत सादर केले. 'जिंदगी है कितनी खूबसूरत' या गझलेच्या माध्यमातून सुचित्रा माटे (डंभारे) आणि आचार्य सुधाकर चौधरी यांनी धम्ममार्ग जीवनमार्ग बनल्यास जीवनातील सौंदर्य, सहजता आणि आनंदाची अनुभूती कशी घेता येते, हे संगीत




व निवेदनातून प्रभावीपणे मांडले. इयत्ता पाचवी व सहावीच्या बालकलाकारांनी शिक्षिका समाधानी वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली 'सच्चा गुरु' ही नाटिका सादर केली. तर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी पाली विषयाच्या शिक्षिका अश्विनी गणवीर यांच्या दिग्दर्शनाखाली 'अनिच्च से पूर्णिमा तक' ही नृत्यनाटिका सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. प्रमुख वक्ते महानाग रत्न यांनी वैशाख पौर्णिमा, गुरु परंपरा, गुरूंचा अर्थ, जीवनातील गुरूंचे स्थान आणि त्यांचे कार्य यावर सोप्या व अभ्यासपूर्ण भाषेत मार्गदर्शन केले. गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित चित्रकला प्रदर्शनात कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. अंजली पाटणे व विद्यार्थिनींनी गुरु परंपरा आणि सच्च्या गुरूची संकल्पना चित्रांच्या माध्यमातून मांडली. कार्यक्रमात प्रमुख अतिथी, वक्ते, संचालक, शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांना गुरुपौर्णिमेनिमित्त गौरवपत्र देऊन सन्मानित केले. विद्यार्थिनींनी तयार केलेल्या कमलपुष्पांनी अतिथींचे स्वागत करण्यात आले, तर बालकलाकारांना कला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी शिक्षक-शिक्षिका सुदत्त मेश्राम, सुरेश सुखदेवे, सुचित्रा, समाधानी, अश्विनी, अश्लेषा गमे, विद्या पझारे तसेच सर्व बालकलाकारांचे मुख्याध्यापिका अर्शिया पठाण यांनी अभिनंदन व आभार मानले. 'शुक्रिया बस शुक्रिया' या नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# निर्मल उज्ज्वल क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड च्या ठेवीदारांचा संघर्ष तीव्र

**नागपूर :** निर्मल उज्ज्वल क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड मधील ठेवीदारांच्या थकीत ठेवी व बचत रक्कम परत मिळण्याच्या प्रश्नावरून ठेवीदारांचा संघर्ष आता अधिक तीव्र झाला आहे. अनेक ठेवीदारांना त्यांच्या मुदतठेवी तसेच बचत खात्यातील रक्कम वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर ठेवीदारांच्या प्रतिनिधींनी आज सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी अजनी पोलीस ठाण्यात लेखी पोलीस तक्रार दाखल केली. या तक्रारीद्वारे संस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी करून ठेवीदारांच्या पैशांबाबत जबाबदारी निश्चित करावी तसेच कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निर्मल उज्ज्वल संस्थेबाबत यापूर्वीही नियामक पातळीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. केंद्रीय सहकारी संस्था निबंधकांनी २४ एप्रिल २०२६ रोजी संस्थेला नवीन ठेवी, योगदान व गुंतवणूक स्वीकारण्यास तसेच विद्यमान ठेवींचे नूतनीकरण करण्यास पुढील आदेशापर्यंत मनाई केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोरील कार्यवाहीतही संस्थेच्या कामकाजासंदर्भात आर्थिक अनियमितता, निधीच्या वळवणुकीचे आरोप, हितसंबंधांचा संघर्ष आणि नियामक अनुपालनाशी संबंधित गंभीर मुद्दे नोंदविण्यात आले आहेत. न्यायालयीन नोंदीत ठेवीदारांच्या हिताला आर्थिक धोका निर्माण होऊ शकतो, अशी केंद्रीय प्राधिकरणाची भूमिका नमूद आहे. दरम्यान, संस्थेच्या कारभाराबाबत 'क्लीन चिट' मिळाल्याच्या चर्चाही अलीकडे झाल्या आहेत. मात्र या संदर्भात विविध प्रश्न उपस्थित होत असून, संपूर्ण वस्तुस्थिती अधिकृत कागदपत्रांच्या आधारे स्पष्ट होणे आवश्यक असल्याची भूमिका ठेवीदारांनी घेतली आहे. ठेवीदारांचे म्हणणे आहे की,




त्यांनी आपल्या कष्टाची व आयुष्यभराची बचत संस्थेत विश्वासाने ठेवली आहे. त्यामुळे ठेवीदारांना एकमेकांशी स्पर्धा न करता पारदर्शक आणि कायदेशीर पद्धतीने त्यांच्या रकमेची परतफेड मिळणे आवश्यक आहे. कोणत्याही ठेवीदारावर अन्याय होऊ नये आणि उपलब्ध निधीचे वाटप पारदर्शक पद्धतीने व्हावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. आमच्या ठेवी, आमचा हक्क; आमचे पैसे आम्हाला परत मिळालेच पाहिजेत," अशी भूमिका घेत ठेवीदारांनी प्रशासन व पोलीस यंत्रणेकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. आज दाखल करण्यात आलेल्या पोलीस तक्रारीच्या माध्यमातून संस्थेच्या संबंधित पदाधिकारी व जबाबदार व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी करून, ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करावे आणि दोष आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ठेवीदारांनी स्पष्ट केले आहे की, हा संघर्ष कोणत्याही व्यक्तीविरोधातील वैयक्तिक संघर्ष नसून हजारो ठेवीदारांच्या आर्थिक हक्कांसाठीचा आणि त्यांच्या कष्टाच्या पैशांच्या सुरक्षिततेसाठीचा लढा आहे. प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून ठेवीदारांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## महत्वाचे

### प्रादेशिक स्तरावरील भरतनाट्यम स्पर्धेत आदिती पाहुरकर प्रथम




**नागपूर :** भारतीय टपाल विभागातर्फे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या प्रादेशिक स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धेत श्रीकृष्ण नृत्यालयची विद्यार्थिनी तथा प्रमिला उन्नीकृष्णन यांची शिष्या आदिती पाहुरकर हिने कनिष्ठ (ज्युनियर) भरतनाट्यम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या उत्कृष्ट यशामुळे तिची आता पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय टपाल विभागाच्या नृत्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आदिती ही केंद्रीय विद्यालयातील इयत्ता ७ वीची विद्यार्थिनी असून ती विशाल पाहुरकर व पूनम पाहुरकर यांची कन्या आहे. आपल्या या यशाचे संपूर्ण श्रेय तिने आपल्या गुरू प्रमिला उन्नीकृष्णन, शाळेतील शिक्षक-शिक्षिका तसेच आई-वडिलांना दिले आहे. आदितीच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

### वर्षावासानिमित्त लुंबिनी बुद्ध विहारात प्रबोधन



**नागपूर :** मानकापूर येथील लुंबिनी नगरातील लुंबिनी बुद्ध विहारात वर्षावासानिमित्त रविवार, ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजता प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. आयुष्मान ओंकार वानखेडे यांनी 'प्रज्ञा, शील आणि करुणा' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रज्ञा, शील आणि करुणा ही केवळ बौद्ध धम्माची तत्त्वे नसून, मानवी जीवनाला योग्य दिशा देणारी जीवनमूल्ये आहेत. विवेकपूर्ण विचार, सदाचरण आणि सर्व प्राणिमात्रांविषयी करुणेची भावना अंगीकारल्यास व्यक्ती आणि समाजाचे जीवन अधिक समतामूलक व मानवतावादी होऊ शकते, असे डॉ. वानखेडे यांनी आपल्या प्रबोधनातून सांगितले. कार्यक्रमाला प्रफुल्ल तागडे, मलके, पिल्लेवान तसेच लुंबिनी बुद्ध विहाराचे पदाधिकारी, उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार अशोक बागडे यांनी केले.

### आदिवासी दिनानिमित्त उत्साहात व पारंपरिक वेशभूषेत मिरवणूक



**गोंदिया :** गोंदिया शहरात जागतिक आदिवासी दिना निमित्त पारंपरिक वादन व पारंपरिक पोशाखातील समाजबांधवांनी भव्य मिरवणूक शहरातील विविध मार्गांवरून काढण्यात आली. मिरवणुकीचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मरारटोली येथे केला आहे. जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या तैलचित्रास खासदार राजेंद्र जैन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण केले. समारोपीय कार्यक्रमात खासदार राजेंद्र जैन यांनी समाजबांधवांना जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्यात व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व खासदार प्रफुल पटेल यांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या विविध समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी तसेच समाजाच्या उन्नती व प्रगतीसाठी प्राधान्याने प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाला सर्वश्री दुष्यंत किरसाण, राजकुमार पुराम, करण टेकाम, ॲड. ओ. एस. मरसकोल्हे, पूजा, तेजराम बिसेन, सीमा कवास, राहुल येल्ले, शीला धनगाये, संगीता पुसाम, ललिता ताराम, फरेंद्र कुतीरकर, केतन तुरकर, नानू मुदलियार, आनंदा वाढिवा मोठ्या संख्येने आदिवासी समाजबांधव उपस्थित होते.

# आशा गटप्रवर्तकाच्या हकालपट्टीप्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे धाव

## 'आसरा' संघटनेची स्वतंत्र चौकशी व पुनर्स्थापनेची मागणी

**नागपूर :** गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयांतर्गत महागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत आशा गटप्रवर्तक कांता कोंडुजी कांबळे यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी 'ॲसोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' (आसरा) संघटनेने मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. संघटनेचे अध्यक्ष संजय थुल यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात आरोग्य विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवल्यामुळे कांबळे यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई करण्यात आल्याचा आरोप केला आहे. कांता कांबळे या २००८ पासून आशा स्वयंसेविका म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर २०१९ पासून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अहेरी तालुक्यातील महागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात आशा गटप्रवर्तक म्हणून त्यांनी सेवा बजावली. मात्र, कंत्राटी कर्मचाऱ्यांवरील अन्याय आणि कामाच्या ठिकाणच्या समस्यांविरोधात आवाज उठवल्यामुळे जून २०२४ मध्ये त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आल्याचा



आरोप संघटनेने केला आहे. कांबळे यांच्यावर कारवाई करण्यापूर्वी कोणतीही कारणे दाखवा नोटीस देण्यात आली नाही, तसेच त्यांना आपली बाजू मांडण्याची संधीही देण्यात आली नाही. केवळ एकतर्फी अहवालाच्या आधारे सेवेतून मुक्त करण्याची कारवाई करण्यात आल्याने हा नैसर्गिक न्यायतत्त्वांचा भंग असल्याचे 'आसरा'ने निवेदनात म्हटले आहे. कांबळे यांनी आपल्या पुनर्स्थापनेसाठी आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार दाद मागितली. तसेच सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन निवेदनही सादर केले. मात्र, अद्याप न्याय मिळालेला नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या मागण्यांमध्ये गडचिरोली जिल्हा आरोग्य प्रशासनाबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करणे, चौकशी पूर्ण होईपर्यंत कांता कांबळे यांना महागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात पूर्ववत सेवेत घेणे, एकतर्फी कारवाईस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच राज्यातील एनएचएम कंत्राटी आरोग्य कर्मचारी व आशा गटप्रवर्तकांच्या सेवा सुरक्षेसाठी ठोस धोरण आखणे, या मागण्यांचा समावेश आहे.

# बाल अत्याचार प्रतिबंधक जनजागृतीसाठी सावी संस्थेचा पुढाकार

**नागपूर :** बालकांवरील लैंगिक अत्याचार, शोषण आणि विविध प्रकारच्या हिंसाचारापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी सावी संस्थेच्यावतीने नागपूर शहरातील विविध शाळांमध्ये 'बाल अत्याचार प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नागसेन विद्यालय, इंदोरा तसेच एस. एस. गर्ल्स हायस्कूल, पंचपावली येथे जनजागृती सत्रांचे आयोजन करण्यात आले. नागसेन विद्यालयातील कार्यक्रमात सुमारे २०० विद्यार्थी व शिक्षकांनी, तर एस. एस. गर्ल्स हायस्कूलमध्ये सुमारे ३०३ विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला. यावेळी बालकांवरील अत्याचाराचे विविध प्रकार, अत्याचाराची संभाव्य चिन्हे कशी ओळखावीत, स्वतःचे संरक्षण कसे करावे, संशयास्पद किंवा धोकादायक परिस्थितीत कोणाकडे मदत मागावी आणि अशा प्रसंगी योग्य पद्धतीने प्रतिसाद कसा द्यावा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात POCSO कायदा, बाल संरक्षण व्यवस्था, शासकीय यंत्रणांची भूमिका, पोलीस, बाल कल्याण समिती (CWC), बाल संरक्षण यंत्रणा तसेच स्वयंसेवी संस्थांकडून उपलब्ध होणाऱ्या मदतीबाबत विद्यार्थ्यांना व शिक्षकांना माहिती




देण्यात आली. अत्याचारामुळे बालकांवर होणारे मानसिक परिणाम, आघातातून सावरण्यासाठी आवश्यक आधार आणि योग्य वेळी मदत घेण्याचे महत्त्व यावरही चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमासाठी बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा छाया राऊत, SAWI Foundationच्या संचालिका प्रियंका बागडे-वनकर, तसेच सुलोचना खांडेकर व त्रिवेणी गाडपायले यांनी मार्गदर्शन केले. दोन्ही शाळांतील शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत करून विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारची जनजागृती सत्रे नियमितपणे आयोजित करण्याची गरज व्यक्त केली. बाल अत्याचार प्रतिबंध, बाल संरक्षण व सुरक्षिततेबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यासाठी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, पालक व समुदायांनी संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन सावी संस्थेने केले आहे. संपर्क : ९४०३९०८३०९, ७३८७३४७१५६. "बालकांचे संरक्षण ही केवळ एका व्यक्तीची किंवा संस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक विद्यार्थी, पालक आणि शिक्षकाला योग्य माहिती व जागरूकता मिळणे आवश्यक आहे," असा संदेश यावेळी देण्यात आला.

# अंधश्रद्धा निर्मूलन समितीची नागपूर जिल्हा मासिक सभा

## डॉ. नरेंद्र दाभोळकर स्मृतिदिनानिमित्त 'निर्भय प्रभात फेरी'चे आयोजन

**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर जिल्ह्याची मासिक सभा दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दैनिक बहुजन सौरभ प्रांगणात आयोजित केली होती. सभेला जिल्हाध्यक्ष प्रा. संध्या राजूरकर, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. सुनील भगत, राज्य समन्वयक रामभाऊ डोंगरे, राज्य सहकार्यवाह देवानंद बडगे आणि महिला राज्य सहकार्यवाह देवयानी भगत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. जिल्हा प्रधान सचिव गौतम पाटील यांनी सभेचे संचालन केले. डॉ. सुनील भगत यांनी दि. २० ऑगस्ट रोजी होणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकर स्मृतिदिनानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. राज्य समन्वयक रामभाऊ डोंगरे यांनी स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची रूपरेषा



मांडली. जिल्हाध्यक्ष संध्या राजूरकर यांनी अंधश्रद्धेविरोधातील चळवळ अधिक व्यापक करण्याचे आवाहन करत दि. २० ऑगस्ट रोजी आयोजित 'निर्भय प्रभात फेरी'मध्ये समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी रामभाऊ डोंगरे, दीप्ती नाईक, देवयानी भगत, वंदना मेंढे आणि प्रीती नगरारे यांचा जन्मदिवसानिमित्त सत्कार केला. शोभा पाटील, मंगला गाणार यांच्यासह मान्यवरांनी चळवळीची गीते सादर केली. प्रीती नगरारे यांनी आभार मानले. सभेला समितीच्या उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, कळमेश्वर, टेक ऑफ सिटी, शिवांगी नगर, न्यू नरसाळा आदी शाखांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यामध्ये कांचन उके, सचिन लेकुरवाळे, सारिका हरिदास धारगावे, रेखा रंगारी, वर्षा सहारे, माही व वसंत मोहिले, सखाराम मंडपे, नरेश महाजन, आनंद मेश्राम, हरेश्वर शहारे, उमेश चित्ते, शारदा खोब्रागडे, सुषमा गुलारेवाडे, ॲड. संघमित्रा बाभरे, वर्षा मेश्राम, ज्योत्स्ना बनसोड, शालिनी मेश्राम, शिल्पा मकेश्वर, अरविंद तायडे, सुनंदा रायपुरे, प्रदीप रायपुरे, भावना सूर्यवंशी, महेंद्र शेंडे, अजय वर्गुट आदींचा समावेश होता.

# महाप्रज्ञा बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभेतर्फे वर्षावास प्रवचनमालिकेला प्रारंभ

**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्षावास प्रवचनमालिका २०२६ अंतर्गत महाप्रज्ञा बुद्ध विहार, जोगीनगर, शताब्दी चौक येथे वर्षावास प्रवचन कार्यक्रम उत्साहात पार पडला.



शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी आयोजित कार्यक्रमाची सुरुवात बुद्धपूजा वंदनेने करण्यात आली. त्यानंतर त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेचे ट्रस्टी व राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव य. आंबेडकर यांच्या निर्देशानुसार, महानगर जिल्हा शाखेच्या नियोजनातून आणि दक्षिण-पश्चिम विभागाच्या संयोजनातून या तीन महिन्यांच्या वर्षावास प्रवचनमालिकेचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रवचनमालिकेच्या प्रारंभी बौद्धाचार्य तथा केंद्रीय शिक्षक देवानंद वानखेडे यांनी 'विश्वगुरू तथागत भगवान बुद्ध व त्यांचे पहिले धम्म प्रवचन : विशुद्धीमग्ग' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. वर्षावासाच्या कालावधीत धम्मविचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या प्रवचनमालिकेचा लाभ धम्म बांधवांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा, नागपूर दक्षिण-पश्चिम विभागाचे विभागीय अध्यक्ष इंजि. नंदलाल मेश्राम होते. अध्यक्षीय संबोधनात त्यांनी भारतीय बौद्ध महासभेचे कार्य, संघटनेची भूमिका तसेच वर्षावास प्रवचनमालिकेचे महत्त्व याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन महानगर कोषाध्यक्ष शुद्धोधन धाबर्डे यांनी केले, तर उमा शंभरकर (रंगारी) यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला महाप्रज्ञा बुद्ध विहाराच्या अध्यक्षा नंदा झोडापे, शिला शेंद्रे, मेघा नगराळे, सरिता मंगेशकर, उमा जागलेकर, चंदा कांबळे, रुपाली नगराळे, माधुरी पाटील, नगराळे यांच्यासह परिसरातील धम्म बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारस एफजीडी प्रकल्पातील कामगारांचे वेतन रखडले




**अकोला :** पारस वीज केंद्रातील एफजीडी प्रकल्पात काम करणाऱ्या सुमारे ६० ते ७० कामगारांना प्रलंबित 'फुल अँड फायनल' वेतन न मिळाल्याने महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती रोजंदारी मजदूर सेनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. प्रलंबित वेतन, किमान वेतनातील फरक, बोनस, घरभाडे, वार्षिक रजेचा पगार, एक महिन्याचा नोटीस पे तसेच २० टक्के व्याजाची रक्कम दि. १२ ऑगस्टपर्यंत कामगारांच्या बँक खात्यात जमा न झाल्यास दि. १३ ऑगस्ट २०२६ पासून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष भाई जी. एम. भालेराव यांनी दिला. एफजीडी प्रकल्पातील संबंधित कंत्राटदाराने कोणतीही लेखी सूचना न देता कामगारांना कामावरून कमी केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. कामगारांच्या मागण्यांसाठी दि. १९ जूनपासून पारस वीज केंद्राच्या गेटसमोर आंदोलन सुरू करण्यात आले होते. त्यानंतर दि. ५ जुलै रोजी प्रलंबित 'फुल अँड फायनल' वेतन कामगारांच्या बँक खात्यात जमा करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप वेतन मिळाले नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. कामगारांच्या प्रलंबित वेतनाची रक्कम दि. ३ जुलै व २१ जुलै रोजी सादर करूनही महानिर्मिती प्रकल्पाचे मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचा आरोप भालेराव यांनी केला. कामगारांना न्याय न मिळाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.




# प्रणोती कळमकर यांचा जवाहर विद्यार्थी गृह येथे सत्कार

**नागपूर :** प्रणोती हरीश कळमकर यांचे साहित्य क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल तसेच अनेक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अध्यक्ष शेखर सावरबांधे तसेच मुख्य कार्यवाह गंगाधर काचोरे यांच्या हस्ते आकर्षक सन्मानचिन्ह, गौरव पत्र, शॉल व पुष्प देऊन जवाहर विद्यार्थी गृह सिविल लाईन्स येथे सोहळ्यात सन्मानित केले. यावेळी मंचावर कृष्णा घुघुस्कर, सुखदेव वंजारी, नगरसेविका मंगला गोवारे उपस्थित होत्या. प्रणोती कळमकर यांच्या यशस्वी सत्कार बद्दल डॉ. तुषार झाडे, विद्या सुरकर, घनश्याम कातुरे यांनी अभिनंदन केले.

# बोधिसत्व सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप



**नागपूर :** बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मल्टीपर्पज सोसायटी, नागपूरच्या वतीने मातोश्री मैनाबाई हायस्कूल, कुकडे लेआऊट, दक्षिण नागपूर येथील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी हा कार्यक्रम आयोजित केला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाला सोसायटीचे सतीश ओरके, रामचंद्र गेडाम, भीमराव मगरे, शत्रुघ्न चवरे, अनुश्री मगरे, अभय शेवाळे व प्रतिभा मेश्राम उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र खापरे, हर्षद शिरसाम, वैभव सातपुते, अर्चना जाधव यांच्यासह शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षद शिरसाम यांनी केले. प्रास्ताविकात मुख्याध्यापक राजेंद्र खापरे यांनी बोधिसत्व सोसायटीच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. गेल्या वीस वर्षांपासून संस्थेने स्वनिधीतून सुमारे तीन हजार गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले आहे. तसेच अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात आली असून त्यातून अनेक विद्यार्थी डॉक्टर, अभियंते व अधिकारी झाले आहेत. कोरोना काळात संस्थेने महाराष्ट्र सरकारला एक लाख रुपये तसेच भोजन वितरण करणाऱ्या सामाजिक संस्थांना ५० हजार रुपयांची मदत केली होती, अशी माहिती त्यांनी दिली. भीमराव मगरे, शत्रुघ्न चवरे व अनुश्री मगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात सतीश ओरके म्हणाले, "गणवेशाचे वाटप करून संस्था आपली जबाबदारी संपवत नाही. विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठीही आर्थिक मदत केली जाईल. गरीब कुटुंबातील असल्यामुळे उच्च शिक्षण घेता येणार नाही, असा न्यूनगंड विद्यार्थ्यांनी बाळगू नये." नीट, आयआयटी तसेच आयएएससारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही मदत करण्याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व फोल्डरचे वाटप करण्यात आले. त्यानंतर पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648